पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, मे २०२६, खंड २५, अंक २, पृष्ठे ४४

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ धास्ती

७ ■ जागतिक संघर्ष आणि ‘नेटो’चे भवितव्य

१३ ■ अलिप्ततावादाकडून ‘व्यूहात्मक स्वायत्तते’कडे...

२२ ■ महासागरातील प्लॅस्टिकचे महासंकट


**उजळणी**


२८ ■ समाजजीवनात निरपेक्ष कर्तव्य बुद्धीने झटले पाहिजे


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २५ (अंक २)**
**मे २०२६**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

संपादकीय

# धास्ती

पोटातील खड्डा दिवसेंदिवस अधिकाधिक खोल होण्यास कारणभूत ठरणारी धास्ती सभोवती दाटत चाललेली आहे. मनातील आशावाद बळकट राखण्याचा कितीही प्रयत्न केला तरी धास्तीचे मळभ काही विरळ होत नाही. त्याला कारणेही निरनिराळी आणि गंभीर आहेत. धास्ती गहन होण्याचे कारण म्हणजे, काळजी वाटण्याजोग्या परिस्थितीच्या मुळाशी असणाऱ्या घटकांवर आपले कोणतेही नियंत्रण नाही. आखातातील अशांतता आणि तिला कारणभूत असणारा अमेरिका–इस्त्रायल–इराण संघर्ष कधी संपुष्टात येईल, हे आजघडीला कोणीही सांगू शकत नाही. जोवर अमेरिका आणि इराण यांच्यादरम्यानचे शत्रुत्व मावळत नाही तोवर होर्मुझची सामुद्रधुनी मोकळा श्वास घेऊ शकणार नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून जहाजांची वाहतूक जिथवर सुरळीतपणे चालू होत नाही तोवर इंधनटंचाईचे सावट वितळणार नाही. इंधनटंचाईचा काच सैलावत नाही तोवर महागाईचा तेवर निवणार नाही. हे सगळे कसे, केव्हा व कोणत्या मार्गाने घडून येईल याचा काहीही अंदाज आज कोणालाही नाही. दुसरीकडे, यंदा समाजमाध्यमांवर 'सुपर एल् निनो' नामक प्रकरण अफाट चर्चिले जाते आहे. कोणी म्हणतात की, गेल्या जवळपास दीडशे वर्षांत ही नैसर्गिक घटना अवतरली नव्हती. 'एल् निनो'चा फेरा काही एक ठरावीक काळानंतर सगळ्या जगालाच कमी–अधिक तीव्रतेने उपसर्ग पोहोचवत असतोच. ते आता सगळ्यांच्या बऱ्यापैकी अंगवळणी पडलेले आहे. परंतु, २०२६ सालातील 'एल् निनो'च्या मागे 'सुपर' हे विशेषण चिकटवले गेलेले आहे अथवा चिकटलेले आहे. प्राथमिक अंदाजांनुसार, या नैसर्गिक घटितापायी, २०२६ सालातील मॉन्सून असाधारण बरसण्याची शक्यता मोठी वर्तविली

जाते. दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८८ ते ९० टक्के इतकीच काय ती पर्जन्यवृष्टी 'सुपर एल् निनो'च्या आवर्तनापायी संभवते, असे भाकित काही हवामानतज्ज्ञ व संशोधन संस्था वर्तवत आहेत. हे कथन मुळातील धास्तीत भरच घालणारे ठरते. जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून आपण कितीही नगारे पिटले तरी, आजही भारतीय शेती ही सर्वस्वी पावसावर अवलंबून आहे, हे चिरवास्तव आहे. आपल्या देशात अन्नधान्याचे जितके वार्षिक उत्पादन होते त्यांतील जवळपास ५४ ते ५७ टक्के उत्पादन एकट्या खरीपाच्या हंगामात होते. त्यांमुळे, एक पावसाळा जरी अनियमित शाबीत झाला तरी त्यांपायी अन्नधान्योत्पादनात घट आणि परिणामी अन्नधान्यघटकांची महागाई या दोन्ही संभाव्यता शक्यतेच्या परीघात प्रविष्ट होतात. विशेषत:, यंदा ही संभाव्यता म्हणजे आगीतून निघून फुफाट्यात पडण्यासारखीच भासेल. कारण, इंधनाचे बाजारभाव तापलेले असल्यामुळे मुदलातच वाहतूक खर्च वाढून त्याचा काही एक भार सगळ्यांच जिनसांच्या बाजारभावांकडे सरकतो आहे अथवा सरकवला गेलेला आहे. त्याला अन्नधान्य व भाजीपालादेखील अपवाद नाही. आता, त्यांतच अनियमित पावसाची भर पडली तर काय अनवस्था परिस्थिती ओढवेल याची केवळ कल्पनादेखील भयकारी ठरते. एक पावसाळा कमी वृष्टीचा ठरला की साहजिकच भूगर्भातील पाण्याची पातळी बाधित होते. आज आपल्या देशात पावसाची अनियमितता अन्नधान्याच्या तुटवड्याचे संकट गहिरे करण्यापेक्षाही पिण्याच्या पाण्याची टंचाई अतितीव्र बनवण्यास अधिकतर कारणभूत ठरते. एक वेळ अन्नधान्य (अगदी चढ्या भावाने का होईना पण) आयात करता येईल; परंतु, पिण्याच्या पाण्याचे काय? आता मे महिना संपतासंपताच आपल्या राज्याच्या काही भागांत तर काही महानगरांच्या काही कोपऱ्यांत पाण्याच्या टँकर्सना असणारी मागणी वाढू लागलेली आहे. म्हणजेच, अन्नधान्यापेक्षाही पाण्याच्या दुर्भिक्षाची धास्ती अधिक वाटते. दुसरीकडे मॉन्सूनच मुळात नेहमीपेक्षा कमी बरसला की जमिनीतील ओलावादेखील उणावतो. साहजिकच त्याचा प्रतिकूल फटका बसतो रबीच्या हंगामाला. आखातातील अशांतता आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीचा आवळलेला गळा यांपायी रासायनिक खतांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठा–

साखळ्यादेखील विस्कळित झालेल्या आहेत. त्यांमुळे, खरीपाच्या तोंडावर रासायनिक खतांचा तुटवडा आणि परिणामी त्यांची भाववाढ यांचा सामना करावा लागतो की काय, अशा धास्तीने बळीराजाला आजमितीस घेरलेले आहे. रासायनिक खतांची भाववाढ सुसह्य बनावी यासाठी शासनसंस्था अनुदानांच्या प्रवाहाला गती देईलही. परंतु, त्यांपायी सरकारच्या महसुली खर्चामध्ये वाढ घडून येऊन त्याची परिणती महसुली तुटीमध्ये, पर्यायाने वित्तीय तुटीत आणि अंतिमत: सरकारी तिजोरीच्या माथ्यावरील अनुत्पादक कर्जांच्या बोज्यात वाढ होण्यात घडून येण्याचीदेखील धास्ती पुन्हा आहेच. अशा परिस्थितीत, आपापल्या पातळीवर दक्ष राहणे आणि अनावश्यक खर्चाला लावता येईल तेवढी कात्री लावत राहणे, एवढीच काय ती उपाययोजना आपण आपल्या पातळीवर करू शकतो. विशेषत:, कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत माहितीवर विसंबून न राहणे आणि एखादी प्रतिकूल वार्ता कानी पडली तरी हडबडून जात काही तरी अतर्क्य वर्तन करणे, हे तर सर्वतोपरी टाळलेच पाहिजे. खास करून, सामाजिक माध्यमांवर दिनरात सक्रिय असणाऱ्यांकडून सध्याच्या वातावरणात अतिशय जबाबदार वर्तनाची अपेक्षा आहे. परिस्थिती अशी जेव्हा चहूंकडून अनिश्चित असते त्या वेळी शासनयंत्रणेच्या पोतडीतही फारसे पर्याय उपलब्ध नसतात. त्यांमुळे, शासनसंस्थेकडून अवास्तव अपेक्षा बाळगण्याला आपणदेखील मर्यादा घातल्या पाहिजेत. अशा प्रतिकूलतेचा सर्वाधिक अधिक तीव्र व सघन चटका बसतो तो आपल्या अर्थकारणातील दोलायमान (व्हल्नरेबल) समाजघटकांना. ग्रामीण भागांतील अल्प व अत्यल्प भूधारक, कोरडवाहू शेतकरी, शेतमजूर, कारागीर, फिरस्ते व्यापारी, आदिवासी तर, शहरोशहरी विस्तारलेल्या प्रचंड अशा असंघटित उद्योगधंद्यांच्या माध्यमातून रोजीरोटी कमावणारे कष्टकरी, दिव्यांग, लहान मुले, आजारी रुग्ण हे आपल्या व्यवस्थेतील कमालीचे 'व्हल्नरेबल' समाजघटक होत. मुळातच, आपल्या देशात सामाजिक सुरक्षेचे कवच संघटित क्षेत्रातील त्या मानाने मूठभरांनाच लाभलेले आहे. अशा परिस्थितीत, अस्मानी आणि मानवनिर्मित संकटांचे फटके-चपेटे 'व्हल्नरेबल' गटात मोडणाऱ्या या समाजघटकांना कमीतकमी कसे बसतील याची दक्षता घेण्यात शासनसंस्थेची खरी कसोटी या सगळ्या काळात लागणार आहे. पंतप्रधानांचे माजी मुख्य अर्थसल्लागार डॉ. अरविंद

सुब्रह्मण्यम यांच्या प्रतिपादनानुसार, आपल्या समाजव्यवस्थेतील ‘व्हल्नरेबल’ घटकांना संभाव्य प्रतिकूलतेपासून अधिकाधिक संरक्षण पुरविणे हे येत्या काळात ‘गव्हर्नन्स’च्या संदर्भातील मुख्य आव्हान असणार आहे. ते आव्हान मुख्यत: शासनसंस्थेच्या पुढ्यातील असले तरी, समाजाचे जबाबदार घटक या नात्याने परिस्थितीला विवेकशील व संयमपूर्ण प्रतिसाद देण्यासाठी सामाजिक स्तरावर एक प्रकारची व्यापक शिस्त आणि सर्वच बाबतींत नेमस्त जीवनशैली व्रतस्थपणे अंगीकारणे, ही आपलीदेखील तितकीच जबाबदारी आहे. आपल्या देशाची ऊर्जासुरक्षा मुळातच परावलंबी आहे. अनियमित पावसाळ्याचा प्रतिकूल परिणाम वीजनिर्मितीवरदेखील संभवतो. कारण, आपल्या देशात निर्माण केल्या जाणाऱ्या एकंदर विजेपैकी सुमारे १२ टक्के वीज पाण्यापासून निर्माण केली जाते. त्यांमुळे, पेट्रोल-डिझेलसारखी इंधने आणि पाणी यांचा या संपूर्ण वर्षात आपल्याला अतिशय काटेकोरपणे वापर करावा लागणार आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– ‘अर्थबोधपत्रिके’चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## आंतरराष्ट्रीय

# जागतिक संघर्ष आणि ‘नेटो’चे भवितव्य

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यामध्ये सुरू झालेल्या संघर्षामुळे सारे जगच एका अस्थिरतेच्या पर्वातून प्रवास करते आहे. अगदी सहजतेने आपण इराणला नमवू अशा धारणेद्वारे अमेरिकेने छेडलेला संघर्ष अजूनही पूर्णांशाने थांबलेला नाही. अण्वस्त्रबंदीच्या मुद्यावरून अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष वाढत राहिल्याने आता तिसरे महायुद्ध भडकते की काय, अशी धास्तीवजा शक्यता वर्तवली जाऊ लागली. अशा पार्श्वभूमीवर, North Atlantic Treaty Organization (NATO) अर्थात ‘उत्तर अटलांटिक करार संघटने’ची भूमिका आणि या सगळ्या संघर्षात अमेरिकेच्या आवाहनानंतरही तिचे सदस्य असलेल्या सर्व युरोपीय राष्ट्रांनी घेतलेला तटस्थतेचा पवित्रा यामुळे NATO चे भवितव्य आता काय असणार, हा मुद्दा कळीचा बनलेला आहे. जागतिक स्तरावरील या संघर्षाच्या दरम्यान घडलेल्या घडामोडी आणि त्यांचे भविष्यातील संभाव्य परिणाम याबाबत जागतिक पटलावर चर्चा सुरू झालेल्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे ते NATO ने स्वीकारलेले अलिप्ततेचे धोरण आणि अमेरिकेची सोडलेली साथ. NATO चे सदस्य असलेल्या युरोपीय देशांनीही इराणविरुद्धच्या संघर्षात आपल्या बाजूने उतरावे असे आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले होते. परंतु त्या आवाहनाला युरोपीय राष्ट्रांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. इराणविरुद्धच्या चढाईत प्रत्यक्ष लष्करी सहभाग घेण्याचे नाकारल्याने अमेरिकेने देशांच्या या युतीला ‘निरुपयोगी’ म्हणून संबोधले आणि गेली ७७ वर्षे अबाधित राहिलेल्या या करारातून बाहेर पडण्याचा इशाराही दिला. उद्या तसे खरोखरच झाल्यास युरोपीय

देशांसाठी ती धोक्याची घंटा ठरू शकेल का, हा या क्षेत्रातील अभ्यासकांमध्ये हा आजचा खरा कळीचा आणि चर्चेचा मुद्दा ठरतो आहे.

अर्थात, भविष्याचा वेध घेण्यापूर्वी आपल्याला इतिहासात मागे जाऊन NATO चे महत्त्व जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. NATO ची स्थापना ४ एप्रिल १९४९ रोजी झाली. सामूहिक सुरक्षितता आणि सोव्हिएत राष्ट्रसंघाचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी ही संस्था कराराद्वारे स्थापन करण्यात आली. सुरुवातीला अमेरिका, कॅनडासह एकंदर दहा देश तिच्यात सहभागी झाले होते. आजमितीला एकूण ३२ देश तिचे सदस्य आहेत. या संघटनेची स्थापना झाली ती शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर आणि तीदेखील सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या विरोधात. सोव्हिएत राष्ट्रसंघाचे विघटन झाल्यानंतर, ज्या कारणासाठी ही संघटना स्थापन झाली होती ते कारणच संपुष्टात आल्याने, ही संघटना विसर्जित होणे गरजेचे आहे, असे अनेकांचे मत होते. तरीही NATO चे अस्तित्व कायम राहिले. शीतयुद्धानंतरच्या काळामध्ये NATO ला आव्हान देण्यासाठी काही लष्करी संघटना अस्तित्वात आल्या परंतु त्या फार काळ टिकल्या नाहीत. त्यांचे अस्तित्व अल्पावधीतच संपुष्टात आले. विविध देशांमधील आर्थिक व व्यापारी संबंध वाढू लागल्यानंतर, अनेकदा, NATO ची गरज काय असे प्रश्न उपस्थित होत राहिले. परंतु बदलत्या काळानुसार NATO ने आपल्या कामाचे स्वरुपदेखील बदलले. सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या विघटनानंतर त्या समूहातील जे देश स्वायत्त रूपाने अस्तित्त्वात आले त्यांच्यासमवेत संवाद आणि सहकार्याची भूमिका NATO ने घेतली. त्यामुळे शीतयुद्धोत्तर काळामध्ये NATO चा विस्तार हा पश्चिम युरोपकडून पूर्व युरोपकडे होऊ लागला.

रशिया आणि युक्रेनमध्ये जो संघर्ष २०२२ सालापासून उफाळून आलेला आहे त्यामध्येदेखील NATO चा विस्तार हे एक प्रमुख कारण राहिलेले आहे. युक्रेन हा NATO चा सदस्य बनण्यासाठी प्रयत्नशील असलेला देश होता व आहेही. तसे झाले तर रशियासाठी ते धोकादायक ठरू शकते अशी भूमिका रशियाने घेतलेली होती व आहे. NATO ही संघटना असावी की नसावी या विषयी मात्र युरोपीय देशांमध्ये मतमतांतरे होती. कारण NATO ही अमेरिकेच्या वर्चस्वाखाली असणारी संघटना आहे. पश्चिम युरोपवर प्रभाव टाकण्यासाठी या

संघटनेच्या माध्यमातून अमेरिका सातत्याने प्रयत्न करीत आलेली आहे. 'कोविड-१९'च्या आकांतानंतर मात्र NATO पुढील आव्हाने अधिकच वाढली. NATOच्या घटनेनुसार सदस्य असलेल्या प्रत्येक देशाने त्याच्या देशांतर्गत एकूण सकल उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम या संघटनेला देणे बंधनकारक होते. मात्र 'कोविड'च्या अरिष्टानंतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था प्रचंड अडचणीत आल्या. औद्योगिक उत्पन्न घटले. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली. आर्थिक विकासाचा दरही खाली आला. अशा परिस्थितीमध्ये कोणत्याही देशाला NATO सारख्या संघटनेसाठी आर्थिक निधी देणे हे जिकिरीचे ठरू लागले. परिणामी, अनेक देश त्यामध्ये चालढकल करू लागले. अशातच इराण-अमेरिका संघर्षात अमेरिकेने NATO कडे मदत मागितली आणि इराणच्या विरोधात युद्धात उतरण्याचे आवाहन केले तेव्हा NATO ने त्यास नकार दिल्याने परिस्थिती अधिकच चिघळली आहे. अमेरिकेने जेव्हा इराणच्या विरोधात संघर्ष सुरू केला तेव्हा त्या आवाहनाला एकाही युरापीय देशाने प्रतिसाद दिला नाही आणि ते सारे तटस्थ राहिले. ही गोष्ट अमेरिकेला मात्र चांगलीच झोंबलेली आहे. त्यांमुळे, आता NATO मधून बाहेर पडण्याचा थेट इषाराच अमेरिकेने दिला आहे. त्यातून युरोपीय देश आणि अमेरिका यांच्यामध्ये आता विसंवादाचे सूर निर्माण झालेले आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर NATO चे भवितव्य आगामी काळात काय राहील हा खरा कळीचा मुद्दा ठरणार आहे. सुरक्षेच्या बाबतीत अमेरिकेने हात वर केल्यास युरोपीय देशांना स्वतःच्या पायावर उभे राहावे लागेल. NATO साठी केल्या जात असलेल्या संरक्षण खर्चामध्ये सर्वाधिक वाटा हा अमेरिकेचा असल्याकारणाने उद्या अमेरिकेने अंग काढून घेतले तर युरोपीय देशांना त्यांचा वाटा वाढवावा लागणार आहे. अन्य देशांना संरक्षणाखातर अधिक व वाढीव खर्च करावा लागल्यास त्यांच्या आर्थिक नियोजनावरही ताण येण्याची शक्यता आहे. समाजकल्याण, शिक्षण व आरोग्य अशा जीवनाच्या अन्य अंगांखातर केल्या जाणाऱ्या आर्थिक तरतुदींना त्यांपायी कात्री लावली जाण्याची शक्यता मग बळकट बनते अथवा बनेल.

**भारतासाठी संधी :** अशा परिस्थितीमध्ये भारताची भूमिका फार महत्त्वाची ठरणार आहे, असे अनेक अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये भारताचे स्थान महत्त्वाचे असेल याची कल्पना आता एव्हाना युरोपीय देशांना येऊ लागलेली आहे. अनेक चढउतारांमधूनही तरून निघालेली लोकसत्ताक राज्यपद्धती आणि उदयोन्मुख आर्थिक शक्ती असणाऱ्या या देशाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही याची जाणीव सर्वांना होते आहे. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्या दरम्यान झालेला ऐतिहासिक मुक्त व्यापार करार हे त्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल गणले जाते आहे. युरोपीय देशांच्या परराष्ट्र धोरणात त्या दिशेने बदल होत चालला असून भारत त्यांना विश्वासू भागीदार वाटतो आहे, असे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. फ्रान्स व जर्मनीसारख्या देशांशीही भारताचे संरक्षण क्षेत्रातील संबंध दृढ होत चालले आहेत. या नव्या बदलांमुळे जागतिक सत्तेचा पट आता हळूहळू बहुध्रुवीय व्यवस्थेकडे सरकत असल्याचे मत या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

**जागतिक सुरक्षाव्यवस्थेच्या पुढ्यातील नवे आव्हान**

अमेरिकेने जर खरोखरीच आपले अंग काढून घेतले तर NATO ही संघटना शक्तिहीन होईल आणि रशियाचा दबदबा व वर्चस्व वाढेल, असा कयास काही अभ्यासक व्यक्त करतात. दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या जागतिक व्यवस्थेच्या सुरक्षेच्या दृष्टीने ते एक मोठे वळण ठरू शकेल. आजमितीला संरक्षणसिद्धतेसाठी सर्वाधिक तरतूद करणारा अमेरिका हा एकमात्र देश असून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, अण्वस्त्रसाठा, गुप्तचर यंत्रणा आणि जगाच्या विविध भूभागांवर प्रस्थापित केलेले सैनिकी तळ, यांमुळे वैश्विक स्तरावर अमेरिकेचा दबदबा आहेच. त्यामुळे, रशिया किंवा अमेरिकेचे अन्य प्रतिस्पर्धी देश थेट विरोधी भूमिका घेण्यापूर्वी विचार करतात. NATO मध्ये अमेरिकेची प्रचंड लष्करी ताकद सहभागी आहे याची त्यांना कल्पना असते. पण उद्या अमेरिकाच त्यातून बाहेर पडली तर मात्र रशियाला युरोपमध्ये आक्रमक भूमिका घेता येणे शक्य बनेल आणि ते अनेक देशांसाठी धोकादायक ठरू शकते, असे काही अभ्यासकांचे विश्लेषण आहे.

**संरक्षणसिद्धतेवर भर :** आजमितीला Poland, Estonia, Latvia, Lithuania या सारखे पूर्व युरोपातील देश भौगोलिकदृष्ट्या रशियाच्या अगदी

जवळ असल्याने ते संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून आहेत. उद्या अमेरिका समजा NATO मधून बाहेर पडली तर या देशांमध्ये असुरक्षिततेची भावना अधिक वाढेल. त्या देशांना सैनिकी सुरक्षेवरील खर्च बऱ्याच प्रमाणात वाढवावा लागेल. अमेरिकेवर अवलंबून नसलेली European Strategic Autonomy (ESA) अशी काही एक यंत्रणा उभारणे मग तशा परिस्थितीत क्रमप्राप्त ठरू शकते आणि त्यासाठी फ्रान्स, जर्मनीसारखे देश पुढाकार घेऊ शकतात. अमेरिकेवर अवलंबून नसलेली स्वतंत्र सुरक्षा प्रणाली उभारण्याच्या दिशेनेही पावले उचलली जाऊ शकतील. परंतु त्यासाठी युरोपीय देशांना संरक्षण धोरणांबाबतचे परस्परांतील मतभेद विसरून एकत्र यावे लागेल, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

**अणुसुरक्षेचे आव्हान :** NATO च्या भवितव्यासंदर्भातील आणखी एक प्रश्न म्हणजे अणुसुरक्षेचा प्रश्न. सध्याच्या परिस्थितीमध्ये अनेक युरोपीय देशांच्या संदर्भात विचार करायचा झाला तर अमेरिका हाच त्यांचा प्रमुख असा आधार आहे. अमेरिकेची या पुढील काळामध्ये साथ मिळणार नसेल युरोपात केवळ फ्रान्स आणि ब्रिटन या प्रमुख दोनच देशांकडे अण्वस्त्रसज्जता राहणार आहे. त्यामुळे युरोपातील परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. अशा परिस्थितीत युरोपातील काही देशांनी अण्वस्त्रनिर्मितीसाठी प्रयत्न सुरू केल्यास जगातील शस्त्रस्पर्धा अधिक वाढण्याची आणि त्यातून नव्या समस्या निर्माण होण्याचीही शक्यता वर्तवली जाते आहे.

अमेरिका हा देश NATO मधून उद्या बाहेर पडला तरीदेखील युरोपीय देश एकत्रितरीत्या समर्थपणे ही संघटना चालवू शकतील असाही आशावाद काही अभ्यासकांकडून व्यक्त केला जातो आहे. जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा या देशांची सामरिक सज्जता चांगली असल्याकारणाने ही संघटना पूर्णपणे कोसळण्याची शक्यता नाही. अमेरिकाकेंद्रित लष्करी आघाडीऐवजी आगामी काळामध्ये या संघटनेचे स्वरूप बदलून युरोपकेंद्री संरक्षण संघटना असे नवे रूप ती धारण करू शकते. अमेरिका NATO तून बाहेर पडल्यास चीन, रशिया आणि अन्य शक्ती जगाच्या पटलावर आपला प्रभाव कसा वाढेल याचा प्रयत्न सुरू करतील. यातून जागतिक पटलावरील अमेरिकेचे स्थान कमकुवत करण्याचा

आणि वैश्विक सत्ताव्यवस्था अधिक बहुध्रुवीय करण्याचा प्रयत्न नियोजनपूर्वक केला जाऊ शकतो, असाही या क्षेत्रातील जाणकारांचा अंदाज आहे.

थोडक्यात काय तर, आजच्या घडीला NATO च्या पाठीशी असणारी सर्वांत मोठी शक्ती अमेरिका ही आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. पण आज नाराज झालेली अमेरिका त्या संघटनेतून उद्या खरोखरच बाहेर पडली तर मात्र त्या घटनेचे जागतिक स्तरावरील संभाव्य परिणाम खूप वेगळे शाबीत होतील. जागतिक सुरक्षाव्यवस्थेतील अनेक देशांच्या भूमिका आणि सुरक्षेसंदर्भात त्यांच्या पुढ्यात उभी असणारी आव्हाने त्यातून बदलतील आणि युरोपीय देशांनाही स्वत:च्या सुरक्षेसाठी अधिक जबाबदारी स्वीकारून सज्ज व्हावे लागेल, हे मात्र नक्की.

***भारतालाही NATO सदस्य राष्ट्रांच्या तोडीचे स्थान?***

*इराण आणि रशियाशी संबंध ताणलेले असताना भारताशीही असणारे संबंध अधिक ताणले जाऊ नयेत यासाठी NATO सदस्य राष्ट्रांच्या तोडीचे स्थान भारताला देण्याचा अमेरिकेचा सध्या प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी भारताला आता Major Non-NATO Ally - MNNA हा दर्जा देण्याचा प्रस्ताव अमेरिकेने पुढे आणला आहे. सागरी सुरक्षा, दहशतवादविरोधी कारवाया, समुद्रातील घुसखोरीविरोधातील उपाययोजना, संयुक्त लष्करी सराव, संरक्षण प्रशिक्षण तसेच संवेदनशील अशा तंत्रज्ञानांचे हस्तांतरण या सर्वांना चालना मिळण्याच्या दृष्टीने हा दर्जा महत्त्वाचा ठरू शकणार आहे. अमेरिका व भारत यांच्यादरम्यानची संरक्षण भागीदारी आणखी सक्षम होण्यास त्यामुळे मदत होईल, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. आशिया खंडामध्ये १९५० च्या दशकामध्ये हा दर्जा या पूर्वी दक्षिण कोरिया या देशाला देण्यात आला होता. सोव्हिएत राष्ट्रसंघ, चीन आणि उत्तर कोरिया या देशांपासून दक्षिण कोरियाचे संरक्षण करण्याची जबाबदारी तेव्हा अमेरिकेने घेतली होती. जवळचा मित्र या नात्याने इस्रायल या देशालाही हा दर्जा अमेरिकेने दिला होता. मात्र, सौदी अरेबिया हा अमेरिकेचा मित्र देश असूनही त्या देशाला अमेरिकेने हा दर्जा दिलेला नाही. त्यामुळेच भारताला हा दर्जा प्राप्त झाल्यास जगातील अनेक राष्ट्रांच्या भुवया उंचावणार आहेत.*

# आंतरराष्ट्रीय

## अलिप्ततावादाकडून 'व्यूहात्मक स्वायत्तते'कडे...

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात नवस्वतंत्र भारताने त्या काळी अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले होते, ही बाब सर्वज्ञात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आंतरराष्ट्रीय संबंधांसंदर्भात काँग्रेस पक्षाने अंगीकारलेली भूमिका, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या पुढ्यात उभी ठाकलेली आव्हाने, अमेरिका आणि सोव्हिएत संघराज्य अशी तत्कालीन वैश्विक सत्तापटलाची प्रस्थापित झालेली द्विध्रूवीय संरचना, विचारसरणीच्या प्रांतात भांडवलशाही आणि समाजवाद-साम्यवाद असे त्या काळात प्रचलीत असणारे दोन बलिष्ठ प्रवाह आणि काँग्रेस पक्षांतर्गत असणारी नेतृत्त्वाची विभागणी व तिच्यात अनुस्युत असणारा ताणतणाव अशा एकंदर पाच घटकांची पार्श्वभूमी त्या धोरणदृष्टीला लाभली होती अथवा लाभली असावी, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. त्या नंतर आज जवळपास आता आठ दशकांचा काळ लोटलेला आहे. २०२२ सालापासून जगाच्या कोणत्या ना कोणत्या भागात युध्यमान परिस्थिती नांदते आहेच. प्रथम युक्रेन-रशिया, त्या नंतर हमास-इस्त्रायल आणि त्यापश्चात आता अमेरिका-इस्त्रायल-इराण अशी संघर्षांची ही मालिका गेली जवळपास चार वर्षे अव्याहत चालूच आहे. सोव्हिएत संघराज्याचे विघटन १९८९सालीच झालेले असले तरी, त्या व्यवस्थेचा कणा असलेला रशिया आणि उभ्या जगाचे, जवळजवळ अगदी आजपर्यंत, सर्वश्रेष्ठ सत्ताकेंद्र गणली जाणारी अमेरिका ही दोन्ही राष्ट्रे आज या संघर्षांच्या मुळाशी आहेत.

या दोन्ही सत्तांशी भारताचे सततच जवळचे व बहुतांशी सौहार्दाचे संबंध राहिलेले आहेत. गेली चार वर्षे उफाळलेल्या हिंसामय संघर्षांच्या या मालिकेने

उभ्या जगाची आणि खास करून आंतरराष्ट्रीय व्यापारव्यवस्थेची घडी पुरती विस्कटून टाकलेली आहे. त्या अंदाधुंदीचे चटके भारतीय अर्थव्यवस्थेला तर, २०२५ सालानंतर, अधिकच तीव्रतेने बसत आलेले आहेत. प्रथम वरवंटा फिरला तो अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या एकतर्फी व्यापारशुल्क वाढीचा. आणि आता, या वर्षातील २८ फेब्रुवारीपासून आखातात उसळलेल्या आक्रांतापायी देशाच्या ऊर्जासुरक्षेच्या पुढ्यात आव्हाने उभी ठाकलेली आहेत. प्रथम युक्रेन–रशिया संघर्ष आणि आता अमेरिका–इस्त्रायल–इराण संघर्ष या दोन्ही दरम्यान भारताने कोणत्याही एका पक्षाची तळी उचलून धरली नाही अथवा या भांडणांत काही थेट अनुकूल–प्रतिकूल मतप्रदर्शन वा टीकाटिप्पणीही केली नाही. या हलकल्लोळात सहभागी असलेल्या प्रत्येक देशाशी भारताच्या राहिलेल्या पूर्वापार संबंधांचा पोत कोठेही बिघडणार अथवा बिनसणार नाही, याची दक्षता भारताने विलक्षण प्रगल्भपणे घेतली. परिणामी, इराणने चिमटीत पकडून ठेवलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून भारताला इंधनपुरवठा करणाऱ्या जहाजांना बिनबोभाट मार्गक्रमण करणे, अमेरिका–इस्त्रायल–इराण संघर्ष ऐन टिपेला असतानाही, शक्य बनले. ज्या कुशल मुत्सद्देगिरीने भारतीय धोरणकर्त्यांनी ही सगळी परिस्थिती आजवर हाताळलेली आहे तिचे वर्णन, परराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रातील परिभाषेत 'व्यूहात्मक स्वायत्तता' (Strategic Autonomy) अशा शब्दसंहतीने केले जाते. म्हणजे, १९४७ ते २०२६ अशा जवळपास ७९ वर्षांच्या कालावधीदरम्यान, परराष्ट्रीय संबंधांच्या प्रांतात, अलिप्ततावादाकडून व्यूहात्मक स्वायत्ततेच्या धोरणदृष्टीकडे भारताचे संक्रमण झालेले आहे. हा सगळा प्रवास समजावून घेण्याचा प्रयत्न करणे उद्बोधक ठरते. परंतु, त्यासाठी प्रथम प्रारंभ करावयास हवा तो अलिप्ततावादाच्या संकल्पनेपासून.

कोणत्याही प्रश्नाचा विचार व आकलन स्वतंत्ररीत्या, कोणत्याही एखाद्या विचारधारेच्या अंमलाखाली न येता, कोणत्याही देशाच्या अथवा देशसमूहाच्या त्या प्रश्नासंदर्भातील भूमिकेची सावली पडू न देता आपल्या देशाच्या तात्कालिक व दीर्घकालीन हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून करण्याचे आपले स्वातंत्र्य अबाधित राखणे म्हणजे अलिप्ततावाद, अशी 'अलिप्ततावाद' या संकल्पनेची

व्याख्या करता येईल अथवा त्या संकल्पनेचा गाभा सांगता येईल. परंतु, इथे एक महत्त्वाची बाब नीट समजावून घ्यावयास हवी. आणि ती अशी की, अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे! एखादी समस्या अथवा प्रश्न कितीही महत्त्वाचा असला तरी त्यांबाबत काहीच भूमिका अथवा बाजू न घेणे म्हणजे तटस्थता. अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे ते या अर्थाने की, पुढ्यात असलेल्या प्रश्नाबाबत आम्ही आमच्या आकलनानुसार प्रतिक्रिया व्यक्त करू, ही भूमिका स्पष्टपणे विदित करण्याचे आपल्या देशाचे स्वातंत्र्य जपणे, हे अलिप्ततावादात अनुस्युत आहे आणि अभिप्रेतदेखील आहे. संबंधित प्रश्नाबाबत मत प्रदर्शित करतेवेळी अन्य एखाद्या देशाच्या अथवा देशसमूहाच्या त्या प्रश्नासंदर्भातील भूमिकेच्या स्वरात आम्ही आमचा स्वर मिळवणार नाही, हे पथ्य पाळणे म्हणजे अलिप्ततावाद.

व्यक्तिगत जीवनासंदर्भातील कोणतेही निर्णय घेण्याबाबत प्रत्येक व्यक्तीस जे स्वातंत्र्य असते तसेच, कोणत्याही प्रश्नाबाबत भूमिका घेण्यास व्यक्ती जशी व जितकी स्वायत्त असते तेच स्वातंत्र्य व तीच स्वायत्तता अलिप्ततावादाची धोरणदृष्टी प्रत्येक राष्ट्रास प्रदान करते. तटस्थतेच्या भूमिकेचा संबंध बहुश: जोडला जातो तो युद्धमय परिस्थितीशी. दोन देश, समजा, युद्धात उतरले असतील तर, तटस्थ भूमिका धारण करणारी राष्ट्रे अथवा देश, युद्धात कोणत्याच बाजूची तळी उचलत आम्ही सहभागी होणार नाही, असे अगदी प्रारंभीच स्पष्ट करून टाकतात. अलिप्ततावादाची कास धरणारे देश मात्र, अशा परिस्थितीत, कोणत्या देशाच्या बाजूने उभे राहावयाचे अथवा नाही की संबंधित दोन देशांच्या भांडणात पडायचेच नाही याचा विचार आम्ही तारतम्याने आमच्या हिताचा विचार करून घेऊ, अशी भूमिका धारण करतात. अशी भूमिका घेण्यास मुबलक धैर्य असावे लागते. कारण, भांडणात कोणाचाच पक्ष न घेणाऱ्यांवर त्या भांडणात सहभागी असणाऱ्या सगळ्यांचीच इतराजी होण्याची दाट संभावना असते.

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात अलिप्ततावादाचे धोरण अधिकृतरीत्या स्वीकारून त्याचा औपचारिक उच्चार जरी स्वातंत्र्यानंतर भारताने केलेला असला तरी, स्वातंत्र्योत्तर भारताने जगातील कोणत्याही देशाचा उपग्रह म्हणून वावरायचे नाही, या संदर्भात कॉँग्रेस पक्षामध्ये थेट १९२०च्या दशकापासूनच स्पष्टता

होती. काँग्रेस पक्षाच्या त्या धोरणाची बीजे रुजलेली होती ती मुळात वसाहतवादी प्रवृत्तींच्या विरोधात. आपले स्वतंत्र सार्वभौम अस्तित्त्व जपत शांततामय मार्गाने विकासाचा पंथ चोखाळायचा असेल तर देशाने वैश्विक समूहातील कोणत्याही एका देशाच्या अथवा देशसमूहांच्या वळचणीखाली उभे राहायचे नाही, यांबद्दल काँग्रेस पक्षाच्या धुरीणांमध्ये एकवाक्यता होती. तिचा एक धागा जाऊन पोहोचत होता तो महात्मा गांधी यांनी पुकारलेल्या असहकाराच्या भूमिकेशी. सर्वांगीण विकासाची कास धरत असताना कोणत्याही परिस्थितीत नवस्वतंत्र भारताने स्वयंनिर्णयाच्या हक्काशी तडजोड करता कामा नये, ही धारणा १९३०च्या दशकापासून काँग्रेस पक्षाच्या विचारविश्वात स्थिरावत राहिली. देशापुढील अथवा समाजापुढील कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक शांततापूर्ण चर्चेच्या माध्यमातूनच घडवून आणली पाहिजे या महात्मा गांधी यांच्या भूमिकेचे पडसादही अलिप्ततावादी भूमिकेमध्ये ऐकू येतात. कोणत्याही एखाद्या विचारधारेशी अथवा देशाशी हातमिळवणी करत त्याच्या रांगेत जाऊन उभे राहण्यापेक्षा सर्वांशीच संवाद अबाधित राखण्याची कार्यपद्धती त्या विचारदिशेत अनुस्युत होती व आहे. परकीय सत्तांच्या जोखडाखालून मुक्तता प्राप्त करण्याच्या वैश्विक स्तरावर चालू असलेल्या चळवळीचाच भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा एक भाग आहे, ही काँग्रेस पक्षाची त्या काळातील सातत्यपूर्ण भूमिका राहिली. त्यांमुळे, वसाहतवादी मनोवृत्ती प्रदर्शित करणाऱ्या सगळ्यांच शक्तींपासून समान अंतरावर राहण्याचा अलिप्ततावादाचा गाभा त्यांतून आपसूकच साकारत राहिला. याच्याच जोडीने, अलिप्ततावादाच्या धोरणाला अस्तर लाभत राहिले ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या वैश्विक जीवनदृष्टीचे. केवळ इतकेच नाही तर, वैश्विक स्तरावर चालू असणाऱ्या महासत्तांच्या कुरबुरींमध्ये न पडता भारतासारख्या नवस्वतंत्र राष्ट्राने स्वत:च्या सामाजिक-आर्थिक विकासावर सर्वतोपरी लक्ष केंद्रीत करावे, या नेहरू यांच्या अतिशय सुस्पष्ट धोरणदृष्टीच्या हातात अलिप्ततावादाच्या तत्त्वप्रणालीचे सुकाणू स्थिर राहिले.

अलिप्ततावादी धोरणाचा अंगीकार नवस्वतंत्र भारताने करण्यामागील कारणे केवळ तात्विक अथवा सैद्धान्तिक स्वरूपाचीच होती असेही नाही. सत्तासंबंधांचा वैश्विक स्तरावरील तत्कालीन आकृतिबंधदेखील त्याला तितकाच कारणभूत

होता. एक तर, दुसरे महायुद्ध नुकतेच संपलेले होते. परंतु, त्याच वेळी जागतिक समुदायात अमेरिका आणि सोव्हिएत राष्ट्रसंघ या दोन महासत्तांच्या अनुषंगाने दोन सामर्थ्यशाली तंबूदेखील आकाराला आलेले होते. या दोन ध्रुवांचे स्वरूप केवळ लष्करीच होते असे नाही. त्यांच्या जुळणीस तत्त्वप्रणालीचेदेखील अस्तर लगडलेले होते. भांडवलशाही अर्थकारणाचा पुरस्कार करणारी अमेरिका आणि समाजवादी-साम्यवादी विचारप्रणालीची तळी उचलून धरणारे सोव्हिएत संघराज्य, अशीही ती विभागणी होती. आशिया तसेच आफ्रिका खंडातील ज्या देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर वासाहतिक जोखडांखालून सुटका करून घेतलेली होती अशा देशांबरोबर संरक्षणविषयक अथवा/आणि लष्करी सहाय्यसंबंधित करारमदार करून त्यांना आपल्या तंबूत ओढण्यासाठी अमेरिका हिरिरीने प्रयत्नशील होती. अर्थात, त्यामागेदेखील राजकीय आणि विचारप्रणालीशी संलग्न प्रेरणा होती. ती प्रेरणा होती साम्यवादी सोव्हिएत राष्ट्रसंघाला लगाम घालण्याची.

परंतु, या संदर्भात नवस्वतंत्र भारताला मात्र आणखी एका बाबीचा विचार करणे क्रमप्राप्त होते. आणि ते म्हणजे भारताचे असणारे भौगोलिक स्थान. प्राकृतिकदृष्ट्या भारताचे स्थान सोव्हिएत रशिया आणि चीन या दोन मोठ्या देशांच्या निकट आहे. साहजिकच, अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन बलदंडांच्या लठ्ठालठ्ठीची झळ, त्यांत, समजा, भारत रशियाच्या बाजूने झुकला असता तर भारतालाच अधिक व लगोलग लागावी हे अतिशय स्वाभाविकच होते. परंतु, त्याच वेळी अमेरिकेलादेखील पूर्णत: दुखावून चालले नसते. कारण, दमदार व सातत्यशील विकासासाठी नवस्वतंत्र भारताला आर्थिक, तंत्रज्ञानात्मक अशा सर्व प्रकारच्या परकीय मदतीची नितांत गरज होती. त्यांमुळे पश्चिमी राष्ट्रांना नाराज करणेदेखील परवडणारे नव्हते. अशा परिस्थितीत अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या तत्कालीन दोन महासत्तांपैकी कोणाच्याही गोटात दाखल होणे आत्मघातकी ठरले असते. त्यांमुळे, या दोन्ही सत्तासमूहांच्या छायेपासून समान अंतरावर दूर राहण्याचा वास्तववादी व तर्कशुद्ध पवित्रा भारताला धारण करणे शक्य झाले असते ते अलिप्ततावादाच्या धोरणदृष्टीची कास धरूनच. आणि म्हणून भारताने त्या वेळी नेमके केलेही तेच!

त्या निर्णयाला काळाच्या त्या टप्प्यावर आणखीदेखील एक परिमाण लाभलेले होते आणि ते म्हणजे काँग्रेस पक्षांतर्गत सत्ताविभाजनाचे व सत्तासंघर्षाचे. १९१७ साली रशियामध्ये घडून आलेल्या बोल्शेविक क्रांतीचे आकर्षण त्या काळात सर्व जागतिक समुदायाला कमी–अधिक प्रमाणात वाटत राहिलेले होते. भारतीय नेत्यांमध्ये थेट भगतसिंगांपासून ते पंडित नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत, विचारसरणीच्या दृष्टीने विविध गोटांत समाविष्ट असलेल्या सगळ्यांच नेत्यांना बोल्शेविक क्रांतीने आणि समाजवादी तत्त्वप्रणालीने आकर्षित केलेले होते. त्यांमुळे, स्वातंत्र्यपूर्व काळातच, १९३८ साली काँग्रेस पक्षामध्ये, नियोजनबद्ध आर्थिक विकासासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आलेली होती. तिचे अध्यक्षपद सुपूर्द करण्यात आलेले होते ते पंडित नेहरू यांच्याकडे. परंतु, त्याच वेळी, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखे काँग्रेस पक्षाचेच वजनदार नेते खासगी कॉर्पोरेट उद्योगविश्वाच्या हितसंबंधांची पाठराखण करणारे होते. मुळात, खासगी मालमत्ता आणि सर्वदूर झिरपलेली खासगी उद्यमशीलता हे भारतीय अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य पूर्वापारचे होते. त्यांमुळे, सर्व उत्पादन साधने शुद्ध शासनसंस्थेच्या मालकीखाली आणणारी समाजवादी विचारसरणी नवस्वतंत्र भारताला तात्त्विकदृष्ट्या तसेच व्यावहारिक पातळीवर सहजासहजी पचणारी नव्हती. पंडित नेहरू हे जरी काँग्रेस पक्षाचे निर्विवाद लोकप्रिय नेते होते तरी राज्याराज्यांतील पक्षसंघटनेवर सरदार पटेल यांची अतिशय भक्कम पकड होती. केंद्रीय मंत्रिमंडळातदेखील देशातील खासगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्राचे हितसंबंध नजरेआड होऊ न देणारे नेतृत्वसुद्धा होते ते सरदार पटेल यांचेच. त्यांमुळे, पक्षपातळीवरील एक व्यूहात्मक संरचना म्हणूनही भांडवलशाही आणि समाजवाद या दोन विचारसरणींपासून समान अंतरावर राहणेच काँग्रेसच्या लेखी सुज्ञपणाचे ठरणारे होते. स्वातंत्र्योत्तर भारताने नियोजनप्रधान अर्थविकासाचा पर्याय निवडत असताना सर्वंकष नियोजनाची कार्यप्रणाली न स्वीकारता 'सूचक नियोजना'चा (इंडिकेटिव्ह प्लॅनिंग) व्यवहार्य मार्ग स्वीकारला हे त्याच तारतम्याचे द्योतक होय. त्या पर्यायाला अधिष्ठान होते ते भारताच्या संमिश्र अर्थव्यवस्थेचे.

पुढे, १९५५ साली बांडुंग येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेदरम्यान अलिप्ततावादाच्या विचाराला संस्थात्मक अधिष्ठान प्राप्त करून देण्याच्या विचारबीजाचा जन्म झाला आणि त्यानंतर, १९६१ साली युगोस्लावियामधील बेलग्रेड येथे अलिप्ततावादाच्या विचाराचे अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेच्या रूपाने संस्थाकरण घडून आले. इंडोनेशियातील बांडुंग येथे १९५५ सालातील एप्रिल महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला आशिया तसेच आफ्रिका खंडांतील तसेच मध्यपूर्वेतील एकंदर २९ राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते. तो काळ होता दुसऱ्या महायुद्धानंतर अवतरलेल्या शीतयुद्धाचा. परकीय पाश्चिमात्य सत्तांच्या जोखडातून मुक्त होण्याची प्रक्रिया आशिया तसेच आफ्रिका खंडातील काही वसाहतींमध्ये तेव्हा गतिमान होती. अशा परिस्थितीत वैश्विक शांती आणि अर्थविकासाची प्रक्रिया यांत तिसऱ्या जगातील नवस्वतंत्र देशांची भूमिका काय असू शकते वा काय असावी, यांबाबत विचारविनिमय करण्याचा उद्देश बांडुंगमध्ये आयोजित करण्यात आलेल्या त्या परिषदेच्या मुळाशी होता. (तेव्हाचा) बर्मा, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया आणि श्रीलंका या पाच देशांनी त्या परिषदेचे प्रायोजकत्व पेललेले होते. १९५४ साली भारत आणि चीन यांच्यादरम्यान झालेल्या करारामध्ये नमूद पंचशील तत्त्वांच्या पायावरच बांडुंग परिषदेने अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेची पायाभूत तत्त्वे आरेखित केली. परस्परांच्या राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काची जपणूक करणे, सदस्य राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाप्रती आदर राखणे, 'ना-आक्रमणा'च्या तत्त्वाचे पालन करणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे आणि समतेच्या तत्त्वाचा अंगीकार करणे ही बांडुंग परिषदेची पायाभूत तत्त्वे होती.

स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या जवळपास आठ दशकांत वैश्विक स्तरावरील सत्तासमीकरणे आता आमूलाग्र बदललेली आहेत. १९८९-९० दरम्यान सोव्हिएत संयुक्त राष्ट्रसंघाच्या घडून आलेल्या विघटनानंतर काही काळ जगाचा सत्ताव्यवहार अमेरिकाकेंद्री राहिला. पुढे २०वे शतक संपता संपता वैश्विक सत्ताव्यवहारात चीनचा उदय झपाट्याने घडून आला. परिणामी, जगाची सत्ताव्यवस्था पुन्हा एकवार द्विकेंद्री बनली. सोव्हिएत राष्ट्रसंघाची जागा पटकावली चीनने. सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या अस्ताबरोबरच शीतयुद्धदेखील अस्तंगत झाले.

साहजिकच, अलिप्ततावादाची भूमिका स्वीकारण्यासंदर्भातील विविध मुद्दे व पैलूदेखील अप्रस्तुत बनले. मुख्य म्हणजे, अलिप्ततावादाच्या भूमिकेची एक प्रमुख मर्यादा, तसे बघितले तर, १९६०च्या दशकातच अनेकांना स्पष्ट झालेली होती. पंचशील करारावरील शाई वाळते न वाळते तोच, म्हणजे, तो करार झाल्यानंतर अवघ्या आठ वर्षांतच चीनने भारतावर आक्रमण केले होते. म्हणजेच, आर्थिक व सामरिक सुदृढता प्राप्त न केलेल्या राष्ट्राच्या अलिप्ततावादी पवित्र्याची पत्रास जगात कोणीही फारशी ठेवत नसते, हे कठोर व कटू वास्तव १९६२ सालीच अधोरेखित झालेले होते. दरम्यानच्या काळात जागतिक स्तरावरील सत्तासमीकरणेदेखील बदलत होती. अमेरिका-पाकिस्तान-चीन या तीन शक्तींचे परस्परांशी निर्माण होत असलेले साटेलोटे नजरेसमोर ठेवून भारताने १९७१ साली, अलिप्ततावादी भूमिकेचा पुकारा जारी असतानाही, तत्कालिन सोव्हिएत रशियाबरोबर शांततापूर्ण सहकार्याचा करार केलेला होता.

जगभरात सर्वत्रच आर्थिक पुनर्रचनेचे वारे १९८०च्या दशकापासून वाहू लागले. भारतामध्ये त्या वाऱ्यांच्या पहिल्यावहिल्या झुळुका प्रवेशल्या त्या १९८५ सालाच्या सुमारास. त्या झुळुकांनी झंझावाताचे रंगरुप धारण केले ते १९९१ सालानंतर. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा मुख्य भर राहिला तो भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेकानेक बंधने शिथिल करण्यावर. परकीय थेट भांडवली गुंतवणुकीला आवतण, निर्यातीवर भर, उद्योगधंद्यांवरील कालबाह्य कायदेकानूंच्या भारात कपात यांसारख्या तरतुदींचा त्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या गाभ्यामध्ये अंतर्भाव होता. जगभरातील विविध देशांबरोबर व्यापारी तसेच तांत्रिक सहकार्यासंदर्भातील करारमदार करण्यावर त्या पुनर्रचना पर्वादरम्यान भर राहिला. आजही तो तसाच स्थिर आहे. साहजिकच, अलिप्ततावादाचे धोरण तसेच पुढे चालू ठेवणे, त्या बदललेल्या अर्थ-राजकीय पर्यावरणात अप्रस्तुत ठरले. अलिप्ततावादाच्या तत्त्वचिंतनाच्या जागी, जागतिक समुदायातील विविध देशांबरोबर एका समान अंतरापर्यंत संबंध राखण्याच्या नवदृष्टीचा स्वीकार करणे, ही जणू त्या सगळ्या पालटलेल्या व्यवस्थेची मागणीच बनली. विविध देशांबरोबर, प्रसंगोपात्त, त्या त्या वेळचे देशाचे हित नजरेसमोर प्राधान्याने ठेवून, अर्थ-राजनैतिक संबंध प्रस्थापित करणे व जोपासणे ही धोरणात्मक

नवदृष्टी भारताच्या परराष्ट्रविषयक धोरणाच्या प्रांतात त्या कालबिंदूपासून प्रवेशली व आता ती स्थिरपद झालेली आहे. १९९१ साली भारताने अवलंबलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे सकारात्मक पडसाद साधारणत: २०००-०१ या वर्षापासून पुढे भारतीय अर्थव्यवस्थेची जडणघडण व तिच्या आगेकूचीचा वार्षिक सरासरी वेग यांत ठोसपणे दृग्गोचर होऊ लागले. त्या सगळ्या प्रक्रियेद्वारे, प्रजासत्ताक राज्यव्यवस्था बद्धमूल बनलेली जागतिक नकाशावरील एक उभरती अर्थसत्ता म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख वैश्विक समुदायाला नव्याने पटू लागली.

अलिप्ततावादाकडून व्यूहात्मक स्वायत्ततावादी परराष्ट्रीय धोरणाकडे भारताची आजवर झालेली वाटचाल हा या सगळ्या घटनाक्रमाचा परिपाक होय. जगातील कोणत्याही एका देशसमूहाच्या अथवा लष्करी आघाडीच्या तंबूत सहभागी होण्यापेक्षा, आपल्या अर्थकारणाचे तसेच संरक्षणसिद्धतेचे त्या त्या वेळचे प्राधान्यक्रम नजरेसमोर ठेवून त्यांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक ते करारमदार व सामंजस्य करार जगभरातील विविध देशांबरोबर करण्याची सक्षम स्वायत्तता भारताने आज संपादन केलेली आहे. अलिप्ततावाद ही नवस्वतंत्र भारताची गरज होती तर, व्यूहात्मक स्वायत्तता ही उभरती अर्थसत्ता म्हणून प्रस्थापित होत असलेल्या भारताच्या वर्धिष्णू सामर्थ्याची खूण होय.

## या अंकातील लेखांचे संदर्भ


- https://quincyinst.org/collection/the-future-of-nato/
- https://www.iss.europa.eu/publications/commentary/natos-76th-anniversary-whats-future-alliance
- https://www.csis.org/programs/futures-lab/projects/future-nato
- https://theoceancleanup.com/oceans/
- https://www.noaa.gov/education/resource-collections/ocean-coasts/ocean-pollution
- https://www.oceanicsociety.org/program-updates/2025-global-ocean-cleanup-results/

# पर्यावरण

## महासागरातील प्लॅस्टिकचे महासंकट

आज मानवजातीसमोर उभ्या असलेल्या विविध पर्यावरणीय संकटांमध्ये प्लॅस्टिकच्या कचऱ्यापायी समुद्रात घडून येत असलेले प्रदूषण ही सर्वांत मोठी आणि गंभीर अशी समस्या आहे. या समस्येचे निराकरण कसे करावे या प्रश्नाने जगभरातील अभ्यासकांना चिंतेने ग्रासलेले आहे. पृथ्वीवरील जीवनाचा आधार मानला जाणाऱ्या महासागरांमध्ये दररोज प्रचंड प्रमाणात कचरा मिसळत असून त्याचे अतिशय गंभीर व दूरगामी परिणाम होत आहेत. समुद्रातील जैवविविधता, पर्यावरणीय समतोल आणि मानवी आरोग्य या तिन्हीच्या दृष्टीने हे सारे परिणाम सचिंत बनविणारे असे आहेत. आजच्या आधुनिक जीवनशैलीमध्ये जगण्याच्या विविध अंगांमध्ये सरसकटपणे वाढता राहिलेला प्लॅस्टिकचा वापर आता निसर्गाच्या विनाशाचे कारण ठरतो आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर झालेल्या अभ्यासांनुसार, आजमितीला प्रशांत महासागरात प्लॅस्टिकचे पाच अब्जांहून अधिक तुकडे विखुरलेले आहेत. महासागरांत ठिकठिकाणी प्लॅस्टिकचे पुंजके साचलेले आहेत. त्यापैकी Great Pacific Garbage Patch हा जगातील सर्वांत मोठा पट्टा असून त्यात प्रचंड प्रमाणावर प्लॅस्टिक साचलेले आहे. Hawaii आणि California यांच्यामध्ये हा मोठा पट्टा पसरलेला आहे. महासागरात कचरा टाकण्याच्या प्रवृत्तीस एकीकडे पायबंद घालणे आणि त्याच वेळी समुद्रात साचलेले हे प्लॅस्टिक काढून समुद्र मोकळा व स्वच्छ करणे, असे हे काम दुहेरी आव्हानात्मक आहे. पाण्यात विखुरलेले हे प्लॅस्टिक कालांतराने महासागरात पसरत जाते. त्याचे आणखी बारीक तुकडे होतात आणि पुढे ते गोळा करणे हे आणखी जिकिरीचे होऊन बसते. प्लॅस्टिकचे ते तुकडे समुद्रातील जीव अन्न समजून गिळतात आणि

परिणामी त्यांच्या जिवितास धोका निर्माण होऊ शकतो. हे प्लॅस्टिक समुद्रात असेच फिरत राहिले तर समुद्रातील जीवांची नैसर्गिक परिसंस्था, मानवी आरोग्य या सर्वांसाठी ते धोकादायक आहे. त्यामुळे त्या दिशेने नियोजनबद्ध प्रयत्न होणे महत्त्वाचे आहे, अशी मागणी पर्यावरणतज्ज्ञ आज आग्रहपूर्वक करत आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, Netherland या देशाने पुढाकार घेतला असून डच संशोधक आणि उद्योजक Boyan Slat यांच्या नेतृत्वाखाली २०१३ साली The Ocean Cleanup ही एक संस्था तिथे स्थापन करण्यात आलेली आहे. महासागरांमध्ये साठलेला कचरा दूर करणे आणि नव्याने कचरा समुद्रात टाकला जाण्यापासून रोखणे ही प्रमुख दोन उद्दिष्टे पुढ्यात ठेवून या महत्त्वाच्या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. जगातील महासागर प्रदूषणमुक्त करणे हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून या संस्थेने कामाची सुरुवात केली. महासागरांमध्ये तरंगणारा प्लॅस्टिकचा कचरा अत्याधुनिक स्वच्छताप्रणालींचा वापर करून दूर करणे आणि नद्यांच्या माध्यमातून समुद्रांत वाहत येणारा प्लॅस्टिकचा कचरा नद्यांमध्येच अडवणाऱ्या प्रतिबंधात्मक प्रणाली (interceptors) विकसित करणे यावर भर देऊन या संस्थेच्या माध्यमातून सातत्याने काम केले जाते आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यास, सखोल संशोधन आणि 'डेटा मॉडेलिंग' यांच्या सहाय्याने प्रदूषणाची प्रमुख केंद्रे ओळखून, त्या त्या ठिकाणी या नव्या यंत्रणा प्रस्थापित करून महासागरांच्या स्वच्छतेची मोहिम २०१३ सालापासून प्रभावी रीतीने राबविली जाते आहे. या मोहिमेचा प्रवास आजवर पुढील चार टप्प्यांमधून होत आलेला आहे :

**(१) Multi-Level-Trawl Expedition (२०१५) :**

The Ocean Cleanup अंतर्गत एक अत्याधुनिक संशोधन साधन विकसित करण्यात आले. Multi-Level-Trawl Expedition या प्रणालीच्या मदतीने समुद्रातील पाण्याच्या ११ वेगवेगळ्या स्तरांचे शोधन-परीक्षण एकाच वेळी करता येत होते. समुद्राच्या वरच्या स्तरांतील काही मीटर खोलीपर्यंतच पाण्यातच प्रामुख्याने प्लॅस्टिक तरंगत असते हे या प्रणालीच्या माध्यमातून सिद्ध झाले.

**(२) Mega Expedition (२०१५) :**

या मोहिमेचा पुढचा टप्पा होता तो म्हणजे Mega Expedition. तीन महिन्यांच्या या व्यापक मोहिमेंतर्गत ३० जहाजे आणि ६५२ जाळ्यांच्या मदतीने Great Pacific Garbage Patch चा (GPGP) धांडोळा घेण्यात यश

आले. या मोहिमेदरम्यान प्लॅस्टिकचे१२ लाखांहून अधिक नमुने संशोधकांनी गोळा केले. प्लॅस्टिकमुळे घडून येत असलेल्या समुद्रातील प्रदूषणाबाबतची अत्यंत महत्त्वाची अशी माहिती या अभ्यासातून समोर आली.

**(३) हवाई सर्वेक्षण मोहिम (२०१६) :**

समुद्राच्या पाण्यातील प्लॅस्टिकच्या मोठ्या आकाराच्या तुकड्यांचा अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी आणखी एक व्यापक मोहिम The Ocean Cleanup ने हाती घेतली. सामुद्रिक पृष्ठभागाच्या हवाई सर्वेक्षणाचा अंतर्भाव असलेल्या या मोहिमेदरम्यान अत्याधुनिक कॅमेरे आणि **सेन्सर्स**च्या मदतीने ३११ चौरस किमी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आले. Great Pacific Garbage Patch मधील (GPGP) प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा अधिक सखोल अभ्यास करणे यातून शक्य झाले. आकाशातून टिपलेल्या छायाचित्रांमुळे वास्तव परिस्थितीचे अधिक स्पष्ट आकलन होण्यासदेखील मदत झाली.

**(४) Pacific Data Expedition (२०२५) :**

अभ्यासाच्या या चौथ्या टप्प्यामध्ये समुद्राच्या पाण्यात आणखी खोलात जाऊन अभ्यास आणि सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दर दोन वर्षानंतर Transpacific Yacht Race ही ऐतिहासिक सागरी नौकानयन स्पर्धा कॅलिफोर्निया ते हवाई दरम्यान आयोजित केली जाते. अशा नौकानयन स्पर्धेतील सहभागी नौकानयनपटूंनी या संशोधन पथकाला सहकार्य केले. समुद्रात आढळणाऱ्या प्लॅस्टिकच्या मोठ्या तुकड्यांना 'जीपीएस' जोडून त्यांचा मागोवा घेण्यात आला. Automated Debris Imaging System ही यंत्रणा बोटींवर बसवून प्लॅस्टिकपायी समुद्रात होत असलेल्या प्रदूषणाची केंद्रे शोधण्यात आली.

अशा सगळ्या प्रयत्नांद्वारे समुद्रातून प्लॅस्टिक कचरा गोळा करण्याची सुरुवात २०१९ सालापासून करण्यात आली. वापरले जाणारे हे तंत्रज्ञान प्रभावी असल्याचे २०२१ सालापर्यंत केलेल्या विविध प्रयोगांती सिद्ध झाले. मासेमारीच्या साधनांद्वारे समुद्रात समाविष्ट होत आलेले प्लॅस्टिक या कचऱ्यामध्ये अधिकतर प्रमाणात असून असा शेकडो टन कचरा गोळा करून तो समुद्रातून बाहेर काढण्यात यश आले आहे. मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक साठलेल्या भागातून ते गोळा करण्यासाठी २०२२ साली 'सिस्टीम ०३' ही प्रणाली विकसित करण्यात आली. कचऱ्याच्या एखाद्या पट्ट्यातील कचरा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सामुद्रिक प्रवाहांद्वारे

वाहत जात राहतो. अशा वाहून नेल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे प्लॅस्टिकच्या तुकड्यांचे अधिक घनतेचे आणि सतत बदलत राहणारे केंद्रबिंदू (यालाच 'हॉटस्पॉट' असे संबंधित शास्त्रीय परिभाषेत संबोधले जाते) तयार होतात. संगणकीय प्रणालींच्या सहाय्याने अशा ठिकाणांचा शोध घेतला जातो आणि त्या नुसार त्या त्या भागांमध्ये स्वच्छतायंत्रणा कार्यान्वित केल्या जातात. समुद्रात मिसळलेले असे प्लॅस्टिक गोळा करण्यासाठी तरंगती स्वच्छताप्रणाली (Floating Systems) तयार करण्यात आलेल्या आहेत. काही मिलिमीटर आकाराच्या लहान प्लॅस्टिकच्या तुकड्यांपासून ते प्लॅस्टिकच्या मोठ्या आकाराच्या तुकड्यापर्यंत, तसेच मच्छिमारांनी मासेमारीनंतर समुद्रातच टाकून दिलेल्या प्रचंड आकाराच्या जाळ्यांपर्यंत असे विविध प्रकारचे प्लॅस्टिक या प्रणालीच्या मदतीने बाहेर काढणे शक्य झाले आहे. जगातील प्रत्येक महासागरीय परिभ्रमण क्षेत्रात अशा प्रणालींचे जाळे उभारायचे आणि समुद्रात येणारा प्लॅस्टिकचा प्रवाह रोखण्यासाठी उपाययोजना करायच्या अशा दुहेरी स्तरांवर प्रयोग करून २०४० सालापर्यंत समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या प्लॅस्टिकपैकी ९० टक्के प्लॅस्टिक हटवण्याचे लक्ष्य The Ocean Cleanupने डोळ्यांसमोर ठेवलेले आहे.

एका अभ्यासानुसार Great Pacific Garbage Patch मध्ये (GPGP) एक लाख टनाहून अधिक प्लॅस्टिक सध्या तरंगते आहे. हे प्लॅस्टिक कोणत्याही स्वरुपात पुन्हा पर्यावरणात जाऊ नये याची दक्षता घेणे हे फार मोठे आव्हान आहे. तसेच हे प्लॅस्टिक असेच समुद्रात राहू देणे हेदेखील समुद्रातील जैव परिसंस्थेसाठी अत्यंत धोकादायक आहे. अशा प्लॅस्टिकवर प्रक्रिया करून त्यातून उपयुक्त उत्पादने तयार करणे हा एक पर्याय ठरू शकतो. त्यामुळे समुद्रातून काढला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा एक समस्या न ठरता उपयुक्त संसाधन म्हणून त्याचा पुनर्वापर कसा करता येईल, या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. २०२० सालच्या ऑक्टोबर महिन्यामध्ये The Ocean Cleanup ने समुद्रातून गोळा केलेल्या प्लॅस्टिकपासून तयार केलेला गॉगल बाजारात दाखल झाला. Great Pacific Garbage Patch मधील (GPGP) प्लॅस्टिक कचऱ्यापासून तयार केलेले हे पहिले उत्पादन ठरले. समुद्रात असलेल्या प्लॅस्टिकपासून ग्राहकांच्या पसंतील उतरतील अशी उत्पादने साकारता येऊ शकतात आणि कचऱ्यालादेखील मूल्य प्राप्त होऊ शकते हे या प्रयोगातून

लक्षात आले. प्लॅस्टिकवर पुनर्प्रक्रिया करून अशी काही अन्य उत्पादने बाजारात आणली जाऊ लागली आहेत. या प्रयत्नांमुळे समुद्रातील प्लॅस्टिक बाहेर काढून समुद्र स्वच्छ करण्याच्या मोहिमेला आणखी चांगली गती मिळाली आहे. कोणतेही मोठे परिवर्तन एकट्याच्या बळावर करता येत नाही. त्यासाठी इतरांचीही साथ तितकीच आवश्यक असते. जागतिक स्तरावरील अनेक मोठ्या उद्योगसंस्थांनीदेखील या प्रयत्नांना भागीदारीच्या रूपात पाठबळ दिलेले आहे. समुद्रातील प्लॅस्टिक गोळा करण्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संबंधित संस्थांनी गेल्या काही वर्षांत महासागरातील प्लॅस्टिकच्या 'हॉटस्पॉट्स्'चा शोध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्यास सुरुवात केलेली आहे. ड्रोन, जीपीएस ट्रॅकर्स आणि संगणकीय 'मॉडेलिंग'चा वापर त्यासाठी अधिक वाढवण्यात आला आहे. त्यामुळे सागरस्वच्छता मोहिमा अधिक प्रभावी कशा ठरतील या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. तसेच नद्यांमधून समुद्रात वाहून येणारे प्लॅस्टिक रोखण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू केलेले आहेत. त्या संदर्भात, गेल्या वर्षी (२०२५ साली) जगभरातील ३० शहरे निवडून तेथील नद्यांमधून समुद्रात जाणारे प्लॅस्टिक रोखून ते वेगळे करण्याच्या दिशेने पावले उचलली गेली. संस्थेच्या २०२५ सालासाठीच्या अहवालानुसार त्या वर्षभरात अडीच कोटी किलोग्रॅम इतका प्रचंड प्लॅस्टिक कचरा समुद्रातून काढण्यात यश मिळाले आहे. आजवरच्या प्रयत्नांद्वारे सुमारे पाच कोटी किलोग्रॅम इतका प्लॅस्टिक कचरा समुद्रातून हटवण्यात संबंधितांना यश आले आहे.

अर्थात एका बाजूला या सगळ्या प्रयत्नांचे जागतिक स्तरावर कौतुक झाले असले तरी त्यातील मर्यादांकडेही तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. यांतील सर्वांत मोठे आव्हान आहे ते महासागरामध्ये मोठ्या प्रमाणावर पोहोचणारे अथवा सोडले जाणारे प्लॅस्टिक. समुद्रांकडे वाहणारा प्लॅस्टिकचा हा प्रवाह रोखण्यात जोवर परिणामकारक यश मिळत नाही तोवर या समस्येवर प्रभावी उपाय सापडणार नाही. साहजिकच, समुद्रातील प्लॅस्टिक दूर करण्याचे प्रयत्न तिथवर तोकडेच ठरत राहतील. सागरी प्रदूषणाचा हा स्रोत रोखायचा कसा, हे या संदर्भातील सर्वांत मोठे आव्हान आहे. दुसरे आव्हान आहे ते त्यासाठी येणाऱ्या खर्चाचे. या स्वच्छता मोहिमा उपयुक्त असल्या तरी त्या खूप खर्चिक आहेत. जहाजे, उपकरणे, कर्मचारी आणि संसाधने या सर्व गोष्टींसाठी येणारा खर्च

मोठा आहे. त्यासाठी सातत्याने लागणारे आर्थिक पाठबळ कसे उभे करावयाचे, हे आणखी एक आव्हान आहे. तिसरे आव्हान आहे ते समुद्रात मिसळलेले प्लॅस्टिकचे सूक्ष्मकण. स्वच्छता मोहिमांद्वारे प्लॅस्टिकचे मोठे तुकडे, मासेमारीची जाळी किंवा इतर स्वरूपांतील लहान-मोठे प्लॅस्टिक गोळा करता येते. परंतु या संदर्भातील खरे आव्हान आहे ते प्लॅस्टिकचे महासागरातील पाण्यात मिसळलेले सूक्ष्मकण दूर करण्याचे. प्लॅस्टिकचे उत्पादन व वापर कमी करणे, प्लॅस्टिकचा पुनर्वापर वाढवणे यांसारखे उपायच या समस्येवरील दीर्घकालीक व परिणामकारक उत्तर असू शकते, अशी भूमिका या क्षेत्रातील जाणकारांकडून आज प्रकर्षाने मांडली जाते आहे.

The Ocean Cleanup ही मोहिम म्हणजे महासागरातील प्लॅस्टिक वेचून काढून सागर स्वच्छ करण्याची केवळ मोहिम नाही तर, पर्यावरणरक्षणाच्या व्यापक उत्तरदायित्वाच्या प्रांतातील ते एक बोलके व छोटे परंतु कळीचे उदाहरण आहे. महासागरातील प्लॅस्टिक प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे याकडे लक्ष वेधण्यात या प्रयत्नांमुळे निश्चितच यश आलेले आहे. पण असे प्रयत्न ही केवळ एकट्या-दुकट्याची किंवा एखाद-दुसऱ्या संस्थेची जबाबदारी नसून ती सामूहिक जबाबदारी आहे. ■■

***महासागर स्वच्छता प्रणाली काम कसे करते?***

*महासागरांमधील प्लॅस्टिक दूर करताना शक्य तितक्या जबाबदार आणि पर्यावरणपूरक पद्धतीने काम करण्यावर भर दिला जातो. त्या दृष्टीने System 03 ही महासागर स्वच्छताप्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सागरी जीवांच्या हिताला प्राधान्य देऊन सागरी पर्यावरणाचे संरक्षण करण्यावर यात प्रामुख्याने भर दिला जातो. महासागरातील प्रदूषणापासून समुद्री जीव अबाधित राहावेत यासाठी प्रतिबंधक साधने (Deterrents) या प्रणालीत तैनात करण्यात आली आहेत. समुद्री जीवांच्या निरीक्षणासाठी कॅमेरे लावण्यात आले आहेत. प्रत्येक सागरी मोहिमेदरम्यान स्वतंत्र निरीक्षकांचीही नेमणूक केली जाते. ते समुद्रातील सर्व हालचालींवर बारीक लक्ष ठेवून असतात. सागरी स्वच्छता मोहिमा राबवित असताना त्याचा पर्यावरणावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही याकडे विशेष लक्ष दिले जाते.*

# उजळणी

## समाजजीवनात निरपेक्ष कर्तव्य बुद्धीने झटले पाहिजे

*सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे १९२४ सालातील मे महिन्यात मुंबई प्रांतिक बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन आयोजित करण्यात आलेले होते. त्या अधिवेशनादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणाचा तर्जुमा ज्ञानप्रकाशच्या तारीख २४ मे १९२४ व ७ जून १९२४ या दोन दिवशीच्या अंकांत प्रकाशित करण्यात आला होता.*

धन्य आहे की अस्पृश्यतेने आम्हास गुलाम म्हणून लेखले नाही. नाही तर किराण्या वस्तुप्रमाणे अथवा गुराढोराप्रमाणे आमचा बाजार झाला असता. अशा प्रकारच्या गुलामगिरीत आम्ही सापडलो नाही याबद्दल कोणी समाधान मानून घेऊ नये. कारण अशा प्रकारची आमची गुलामगिरी असती तर त्यातून आमची सुटका लवकर झाली असती. प्राचीन काळातील रोम, ग्रीस इत्यादी राष्ट्रात दास्यत्वाचा म्हणजे गुलामगिरीचा शिरस्ता असे. अनेक कारणांमुळे त्या देशातील लोकांना गुलाम बनण्याची पाळी येत असे व एकदा मनुष्य गुलामांच्या यादीत दाखल झाला म्हणजे जड वस्तुप्रमाणे त्याची स्थिती होऊन तो सर्व प्रजाजनांच्या हक्कास वंचीत होत असे. हिंदुस्थानातील अस्पृश्य लोक रोमन लोकांच्या गुलामाप्रमाणे जड वस्तुच्या स्थितीला पोचले नाहीत ह्या दृष्टीने पाहता हिंदुस्थानातील अस्पृश्यता रोमन व ग्रीक लोकातील गुलामगिरीपेक्षा बरी असे कोणी म्हणतील व एका दृष्टीने ते खरेही आहे. पण दुसऱ्या दृष्टीने पाहता अस्पृश्यता ही गुलामगिरीपेक्षा अत्यंत वाईट अशी स्थिती आहे. गुलाम लोक गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्र प्रजाजनांच्या स्थितीला जाऊन पोचल्याची साक्ष सारा रोमचा इतिहास देत आहे. पण हिंदुस्थान देशाच्या इतिहासात अस्पृश्यांचा स्पृश्य झाल्याचा एकही दाखला देता येत नाही, रोमन लोकातील

गुलामगिरी ही कालिक स्थिती असे व त्यातून सुटका होण्यास अनेक मार्ग मोकळे असत. त्याच्या उलट अस्पृश्यता ही त्रिकालाबाधित अशी स्थिती आहे व त्यापासून सुटका होण्यास कोणताच मार्ग नाही. जन्मत: जो अस्पृश्य तो मरेपर्यंत अस्पृश्य असा करडा नियम असल्यामुळे शतकेच्याशतके लोटली तरीपण अस्पृश्य समाज अस्पृश्यच राहिला आहे. याशिवाय इतर बाबीतही हिंदुस्थानातील अस्पृश्यता रोमन लोकातील गुलामगिरीपेक्षा वाईट असेच म्हणावे लागते. रोममधील गुलामांच्या उन्नतीच्या आड जितकी त्यांची गुलामगिरी येत असे त्याच्या अनेक पटीने आमच्या आड आमची अस्पृश्यता येत आहे असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. हे घाणेरडे धंदे करतात, गुरे फाडतात, मोऱ्या-नाले उपसतात, गलिच्छ वस्त्रे वापरतात, अभक्ष भक्ष्य खातात, नानाप्रकारच्या बीभत्स प्रकारच्या देवतांची पूजा करतात, अशा प्रकारचे एक नव्हे, दोन नव्हे, नऊ लक्ष आरोप आपल्यावरती करण्यात येतात. आरोप करणे अगदी सोपे आहे; पण त्या आरोपाला जबाबदार कोण आहे याचा आरोप करणारे तितका विचार करीत नाहीत.

खरे म्हटले असता जे आरोप करतात त्यांच्यावरच त्याची जबाबदारी पडते. मनुष्यसमाजातील पिढ्या एकामागून एक मरून जातात परंतु पुढची पिढी आपले सर्व संप्रदाय, चालीरिती, धर्मभावना इत्यादी सर्व संस्कृती, आपल्या मागच्या पिढीपासून शिकून घेते. तेणेकरून समाजातील घटक जरी लुप्तप्राय झाले तरी समाज हा अव्याहत चालू राहतोच. आजच्या हिंदू समाजात अशा प्रकारचे संघटन मुळीच होत नाही. आमच्यातील हे भूदेव, त्यांचा आमचा संबंध तर कधीच जवळून येत नाही, मग त्यांच्या चालीरिती आमच्यात याव्या कशा? उपनिषदातील तत्त्वे जर आमच्या कानी घालण्यास ते तयार नाहीत तर आमची मरीआईची पूजा कशी जाणार? वेद आम्ही ऐकू नये अशी जर त्यांची आज्ञा आहे तर आमच्या लावण्या सुटणार कशा? आम्हाला मुंज करून जानवे घालण्याचा त्यांनी निश्चय केला तर आम्ही शुचिर्भूत राहाणार नाही काय? सारांश, आमच्यात वाईटाचा संचार झाला आहे, असा जर आमच्यावर आरोप लावण्यात येत आहे, तर आमचे उत्तर हे आहे की, चांगल्याची शिकवणूक आम्हाला कोणी दिली? ब्राह्मणाच्या मुलात ब्राह्मणाच्या

चालीरिती किंवा आमच्यातील ख्रिस्ती झालेल्यात ख्रिस्ती लोकांच्या चालीरिती यांचा प्रादुर्भाव कसा होतो व ब्राह्मणाच्या चालीरितीचा प्रादुर्भाव आम्हा अस्पृश्यात का होत नाही याचा बारकाईने विचार केला असता सहज कळून येण्यासारखे आहे की, अशा प्रकारचा प्रादुर्भाव होण्यास उभय पक्षात जिव्हाळ्याचा, निकट व अन्योन्य संबंध असावा लागतो. अस्पृश्यतेमुळे हिंदू समाजातील वरिष्ठात तशा प्रकारचा संबंध येणे शक्य नाही. यामुळेच ज्या त्या समाजाच्या बऱ्या-वाईट चालीरिती ज्या त्या समाजास चिकटून राहिल्या आहेत. रोमन लोकातील गुलामगिरीत अशा प्रकारच्या अस्पृश्यतेच्या छटा नसल्यामुळे वरिष्ठांच्या गुणागुणांचा पाठ त्यांच्या नित्य नजरेसमोर असे इतकेच नव्हे, तर तो ते गिरवीत असत.

परंतु अस्पृश्यतेच्या पायी अशी वागणूक झाली असल्यामुळे हा कलंक धुवून जाईल याकडे आपल्यातील सर्व लोकांचे लक्ष लागून गेले आहे. यासाठी अनेक प्रकारचे उपाय सुचविलेले दिसतात. काही लोकांचे असे म्हणणे आहे की, अस्पृश्य लोकांनी देशांतर करावे. केवळ आपल्या लोकांच्या हिताच्या दृष्टीने जर आपण पाहिले तर या देशांतराच्या सूचनेत पुष्कळ हित साठविलेले आहे, असे म्हणण्यात हरकत नाही. चतकोर भाकरीच्या तुकड्यासाठी गावातील साऱ्या लहान-थोरांच्या लाथा खाण्यापेक्षा फिजी, ईस्ट आफ्रिका, न्युगिनी वगैरे देशात जाऊन नशीब काढणे केव्हाही हितावह होणार आहे. हिंदुस्थानातील लोकास परदेशात गेले असता तेथील प्रजाजनाप्रमाणे समसमान हक्क प्राप्त होत नाहीत, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. तरी पण माझी खात्री आहे की, हिंदी म्हणून परदेशात जो त्रास होईल तो हिंदू म्हणून आपल्या स्वदेशात आपल्याला जो त्रास होतो त्याच्यापेक्षा केव्हाही जास्त होणार नाही. इतकेच नव्हे, तर आपल्या देशात हिंदू धर्माच्या बंधनामुळे द्रव्यार्जनाचे मार्ग बंद आहेत ते सर्वस्वी खुले होऊन आपल्यातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारेल यात मुळीच शंका नाही.

परंतु सर्वच लोकांना देशांतर करणे शक्य होणार नाही, झाले तर फार थोड्यांनाच ते शक्य होणार आहे. तेव्हा या देशात राहूनच अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याचे मार्ग शोधून काढले पाहिजेत. तशा प्रकारचा दुसरा मार्ग म्हणजे

धर्मांतर. कोणत्याही धर्माकडे आपण जसे तात्त्विक तसे व्यावहारिकदृष्ट्याही पाहिले पाहिजे. तात्त्विकदृष्ट्या हिंदू धर्म कोणत्याही धर्मास हार जाणार नाही, असे माझे मत आहे. नव्हे कोणत्याही धर्माहून तो श्रेष्ठच गणला जाईल. या हिंदुधर्मात 'सर्वाभूती एक आत्मा' असे मूलतत्त्व आहे. या उदात्त तत्त्वाप्रमाणे जर समाजघटना झाली असती तर ज्याप्रमाणे दिवा घरच्यावर तेवढा उजेड करावा व परक्यावर अंधार पाडावा असे करीत नाही किंवा ज्याप्रमाणे वृक्ष जो त्याचा उच्छेद करतो अथवा जो त्यास पाणी घालतो, या उभयतास सारखीच सावली देतो किंवा पाणी ज्याप्रमाणे गाईची तृषा हेरून वाघांना विष होऊन मारून टाकीत नाहीं तशी हिंदुंची समबुद्धी असती तर! परंतु हिंदू समाजाचे व्यावहारिक स्वरूप किती किळसवाणे झाले आहे, आचाराला व विचाराला कोठे मेळ आहे काय? जे लोक सर्वांभूती एक आत्मा आहे असे कंठशोष करून सांगतात त्याच लोकांनी मनुष्यासारख्या मनुष्याला अपवित्र व अस्पर्श लेखावे हे नवल नव्हे काय? पण याहूनही चीड येण्यासारखी जी दुसरी गोष्ट आहे ती ही की, जे लोक हिंदू धर्मावर श्रद्धा ठेवत नाहीत त्यांना मात्र आमचे वरिष्ठ हिंदू समदृष्टीने लेखतात. ख्रिश्चन लोक अपवित्रही नाहीत व अस्पृश्यही नाहीत. वरिष्ठ हिंदूंना त्यांच्या स्पर्शाने विटाळ होत नाही व त्यांच्या हाताखाली राबण्यात कमीपणा वाटत नाही. तसेच, एका दृष्टीने मुसलमान लोक हिंदूतील कोणत्याही अती नीच वर्गापेक्षा विशेष अस्पृश्य व अपवित्र आहेत असे म्हणणे भाग आहे. कारण कोणताही हिंदू गोवध करून त्या मांसावर उपजीविका करीत नाही. मुसलमानास व ख्रिश्चन लोकास तसे करण्यास मात्र प्रत्यवाय नसून महार, मांग, धेड वगैरे हिंदुपेक्षा त्यांना पवित्र व स्पर्श मानण्यात येते. त्यांचा व वरिष्ठ हिंदूंचा हर एक प्रकारचा बाह्य व्यवहार घडतो व त्यांची मुले एका शाळेत व एका वर्गात शिकतात. ते एका रस्त्याने जातात येतात. एका विहिरीवर पाणी भरतात व इतर बाबतीत समान वृत्तीने वागतात. परंतु ज्या आम्हास वैदिक धर्म शिरसावंद्य, आमचा विचार-आचार हिंदू, त्यांचा ते तिरस्कार करतात. इतकेच नव्हे तर ते आम्हाला जनावरांपेक्षाही कमी लेखतात.

ज्या धर्माची तत्त्वे इतकी उच्च पण त्याचा व्यवहार इतका नीच त्या धर्मात राहून आमची उन्नती होईल की नाही असा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो. परंतु

आपल्या लोकांनी धर्मांतर करावे की नाही या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. धर्म हा मनुष्यास आवश्यक आहे की नाही या वादग्रस्त प्रश्नात जाण्याची माझी इच्छा नाही. एवढे मात्र खरे की, काही लोकांना आणि विशेषत: हिंदू लोकांना जर प्राणाहून काही प्रिय असेल तर तो धर्मच आहे, पण ज्या धर्मात माणसाला माणुसकी नाही, तो धर्म काय कामाचा? जो धर्म त्याच्या अनुयायांना ऐहिक व पारलौकिक सुखाची द्वारे मोकळी करण्याऐवजी ती चंद्र करूनच त्यांना अधोगतीत खितपत पडावयास लावतो त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे?

देशांतर व धर्मातर याशिवाय नामांतर हा एक अस्पृश्यता निवारणार्थ नवीन उपाय सांगण्यात येत आहे. अलीकडे अस्पृश्यांनी आदि हिंदू म्हणवून घ्यावे असे सुचविण्यात येत आहे. या बाबतीत मतभेद व्हावयाचे कारण आपणास कोणते नाम अधिक शोभते हे आहे. हा बऱ्याच अंशी हौसेचा प्रश्न आहे. तेव्हा हा प्रश्न वादविवादाने सोडविला जाईल असे काही सर्वस्वी म्हणता येणार नाही. असे जरी आहे तरी या नावाच्या प्रश्नात काही नाही, असे म्हणून चालावयाचे नाही, इतकेच नव्हे तर नावात सारे सार आहे, असे म्हटल्याने मुळीच अतिशयोक्ती होत नाही, असे माझे मत आहे. याला अनेक कारणे आहेत.

अस्पृश्यात जातीभेद यासंबंधी जे वादविवाद होतात, त्यात जातीभेद व अस्पृश्यताही शाखात्मक आहे असे गृहीत धरले जाते व तदनुसार रोटी-बेटी व्यवहारादी उपाय शाखात्मक आहेत म्हणून लोक पाळतात. या म्हणण्यात जर काही तथ्यांश असेल तर कायद्याने हिंदूतील जातीस रोटी-बेटी व्यवहारांची मोकळीक दिली तर ती त्यांनी अंमलात आणण्यास आपली तयारी दाखविली पाहिजे, पण वस्तुत: पाहता लोक तशा प्रकारची तयारी दाखवत नाहीत हे निर्विवाद आहे. परस्परात बेटी व्यवहार करण्याचा कायदा पास होऊन आज ३ वर्षे झाली. पण त्या कायद्याचा फायदा घेतल्याचे फारसे ऐकिवात येत नाही. याचे खरे कारण माझ्या मते असे आहे की जातीभेद व अस्पृश्यता ही शाखात्मक नसून भावनात्मक आहेत. म्हणून ती जर आपणास घालवावयाची असतील तर आपण शाखावर प्रहार न करता नावाचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

ही भावना आपणास कशी नष्ट करता येईल याचा मी अनेकवार विचार केला आहे. विचारांती माझे असे ठाम मत झाले आहे की, अस्पृश्यता व जातीभेद ही काय ती नावात साठविलेली आहेत. वरिष्ठ लोक आपला तिरस्कार करतात. ते केवळ आपल्या नावामुळेच. महार म्हटला की, ऐकणाऱ्याच्या मनात अमुक एक प्रकारची तिरस्कारमय भावना उभी राहते, मराठा म्हटला की निराळी भावना उत्पन्न होते व तोच ब्राह्मण म्हटला की आदरात्मक भावनेने ऐकणारा प्रेरित होतो. ही गोष्ट कोणासच खोटी आहे म्हणून म्हणता येणार नाही. अस्पृश्यतेच्या खुणा व मुद्रा सर्व भागात एकच नाहीत. एका भागाच्या खुणा दुसऱ्या भागाला अवगत नाहीत. एका प्रांतातील अस्पृश्य दुसऱ्या प्रांतात खुणेच्या अभावी स्पृश्य लेखला जातो. माणूस म्हणून माणूस किंवा जात म्हणून जात अस्पृश्य नाही. अमुक एक नाव धारण करणारे लोक अस्पृश्य गणले जातात. ते नाव ज्यांना नसेल ते स्पृश्य गणले जातील हा समाजाचा ठोकताळा बांधला गेला आहे. नाही तर अस्पृश्य माणसांच्या रचनेत, त्वचेत, रूप-रंगात, स्पृश्य माणसापेक्षा काही निराळे आहे असे नाही, की लगेच पाहिल्याबरोबर ज्या प्रकारे सिद्दी लोकांस युरेपियनांपासून किंवा दोघांसही चिनी-जपानींपासून अलग करता येते त्याप्रमाणे अस्पृश्यांना स्पृश्यांपासून निराळे करता येईल. नावाशिवाय अस्पृश्य ओळखण्याची दुसरी खुण, मुद्रा काही नाही. म्हणून माझ्या मते नामांतर करणे इष्ट आहे.

येथवर जे नामांतर करा म्हणतात, त्यांचे व माझे एक मत आहे. परंतु मुंबई इलाख्यातील अस्पृश्य वर्गाने आदि-हिंदू म्हणवून घ्यावे यात काय हशील आहे ते मला समजत नाही. याने अस्पृश्य वर्गात समावेश होणाऱ्या सर्व जातीचे एकीकरण व्हावे असा जर उद्देश असेल तर 'बहिष्कृत' हे नाव काय वाईट आहे? यासारखे दुसरे अर्थपूर्ण व टोपण नाव देता येईल की नाही याची मला शंका वाटते. आदि या नावाने अस्पृश्यता जाईल असा जर या नव्या धोरणाचा हेतू असेल तर तो केवळ भ्रम आहे. महार लोक केव्हा केव्हा लाजेमुळे कोणी कोणी विचारले असता मी चोखा म्हणून सांगतात. तसेच चांभार मी रोहिदास असे म्हणतो, पण एका नावाने ते जितके अस्पृश्य तितकेच दुसऱ्या नावाने ते अस्पृश्य आहेत. मद्रासेत अस्पृश्य वर्ग आदि द्रविड म्हणवून

घेतात. परंतु तेणेकरून त्यांची अस्पृश्यता गेल्याची साक्ष कोणी देत नाही. अस्पृश्यता व जातीभेद ही नावात साठविलेली आहेत, हे सर्वस्वी खरे आहे आणि ती नावे लुप्त केल्याखेरीज भागायचे नाही, आम्ही आपली जातीवाचक नावे सोडून फक्त चालणार नाही तर आमच्याबरोबर सर्व जातीनी आपली जातीवाचक नावे सोडून सर्वांनी सर्वसाधारण असे एक नाव धारण केले पाहिजे. माझ्या मते सर्वांनीच फक्त हिंदू असे म्हणावे व जातीवाचक पोटनावे काढून टाकावीत. कोणी स्वत:स ब्राह्मण, मराठा, महार, चांभार, मांग इत्यादी न म्हणता फक्त 'हिंदू' असे म्हणावे तेणेकरून समाजात समता उत्पन्न होऊन एकी होईल. हिंदू म्हटल्याने कोणास कोणाचा तिरस्कार वाटणार नाही. कोणी कोणास हीन लेखणार नाही व कोणी कोणास श्रेष्ठ मानणार नाही. शिवाय व्यक्ती-व्यक्तीची परस्परातील सहानुभूती जातिवाचक न राहून आज समाजात अन्याय, बेकी, बेदिली नष्ट होऊन बिमोड होईल. आज मराठा असला तरच इतर मराठा त्याला आपली सहानुभूती दर्शवितो. तसेच ब्राह्मण ब्राह्मणाशिवाय सहानुभूती दाखविण्यास तयार होत नाहीत. परंतु जेथे सर्वच हिंदू तेथे सहानुभूतीच्या आड काहीच नाही. मुसलमान समाजात आज जी एकी आहे तिचे तरी कारण काय, हेच. त्यांच्यात मुसलमान म्हटला की झाले. तो आपला झाला. तसे हिंदुमध्ये व्हावयास त्यांना सर्वसाधारण असे नाव पाहिजे व ते हिंदू असावे, असे माझे मत आहे.

ही स्थित्यंतरे घडून येतील तो सुदीन; पण ही घडवून आणण्यास काय करावे, हा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे.

काही बाबतीत राजदंड लाविल्याखेरीज सामाजिक अन्यायाचे निर्मूलन होणे दुरापास्त आहे. म्हणून सामाजिक व धार्मिक बाबतीत जेथे तेथे कायदा करून सुधारणा करावी की न करावी यासंबंधी बरीच भवती न भवती होऊन, शेवटी इंग्रज सरकारने असा ठराव केला आहे की जाती व रूढी यावर कायद्याचा पगडा बसविण्यास आपण कबूल नाही. या दृष्टीने पाहता हिंदुस्थानात स्वराज्य मिळविण्याचा योग आला आहे, ही मोठीच आनंदाची गोष्ट आहे; असे मी समजतो. कारण ब्रिटिशांचा राजदंड आम्हास 'असून अडथळा व नसून खोळंबा' असा आहे. आमच्या लोकास स्वराज्याचे मोठे भय वाटते व आम्हास स्वराज्य

ज्याचे रूपांतर पेशवाईतच होईल असे भासते पण तसे म्हणणे कोणत्या विचाराचे दर्शक आहे? कारण पेशवाई स्वराज्य व हल्लीचे स्वराज्य यात बराच फरक आहे. पेशवाईमध्ये एकदा स्थापलेले राजे वंशपरंपरा राज्य करीत असत. प्रजेच्या संमतीने राज्य करीत नसत. भावी स्वराज्यात राज्यसरकार प्रजेच्या संमतीने चालणारे असून त्यात कायमचे राजे असे कोणीच असू शकणार नाहीत. अशा प्रकारच्या स्वराज्यात जर प्रजेच्या हिताची हेळसांड झाली तर तिचे संवर्धन दुसऱ्या प्रकारच्या कोणत्याच राजकारणात होणार नाही असा सर्व जगाचा अनुभव असल्यामुळे प्रजासंमत स्वराज्य ही सर्वोत्तम अशी राज्यव्यवस्था आहे हे निर्विवाद आहे. अशा प्रकारच्या स्वराज्याला आपण बुजून का जावे याचा मला मोठा विस्मय वाटतो. उलट त्याच्या प्राप्तीप्रित्यर्थ आपण प्रयत्न करणे फार जरूर आहे. मला स्वराज्य म्हणजे काय अभिप्रेत आहे याचा अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे.

आज हिंदुस्थानात स्वराज्य संबंधाने जे वादविवाद होत आहेत त्यात मुख्यत्त्वेकरून ब्रिटिश लोकांच्या हाती असलेली सत्ता क्रमाने काढावी की एकदम काढून घ्यावी याच प्रश्नावर सगळा भर दिला जातो. काढून घेतलेली सत्ता कोणाच्या संमतीने वापरण्यात यावी याचा कोणीच विचार करीत नाही. समजा प्रत्यक्ष आलेली सत्ता जर एकाच वर्गाच्या संमतीने अंमलात आणली गेली तर आज ब्रिटिश आमदानीत जी स्थिती आहे तिच्यापेक्षाही दसपटीने वाईट होणार नाही कशावरून?

यास्तव सत्तेच्या प्रश्नाइतका किंबहुना तिच्याहीपेक्षा जास्त महत्त्वाचा असा हा संमतीचा प्रश्न आहे आणि ज्याअर्थी आमच्यातील स्वराज्यवाद्यांनी तो मुद्दा गौण म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले आहे त्याअर्थी त्यांना जनअपवादाची किती पर्वा आहे हे उघड आहे. आपण मात्र या प्रश्नाचा पिच्छा पुरविला पाहिजे. कारण स्वराज्य जर येणार, तर त्यात आम्हास इतरांसमान अधिकार पाहिजे आणि तसा अधिकार प्राप्त होण्यास आपण मतदानाचा जो राजकीय हक्क तो प्राप्त करून घेतला पाहिजे. हल्ली मतदानाचा हक्क इतका संकुचित करण्यात आला आहे की, साऱ्या हिंदुस्थानात शेकडा दोन लोक यासच तो प्राप्त झाला आहे असे मी समजतो. यानें आपला दोपदरी फायदा होणार आहे. एक तर

आज कायदे कौन्सिलातर्फे जी आपली हेळसांड होते ती होणे शक्य नाही. जे लोक आपण मत दिल्यामुळे निवडून येतील त्या लोकांना आपल्या हिताविषयी बेपर्वा राहून चालावयाचे नाही. कारण आपल्या हाती त्यांची लगाम राहणार आहे. मतदानाच्या हक्कापासून आपला एवढाच फायदा होणार आहे असे नाही. त्यापासून दुसरा एक महत्त्वाचा फायदा आहे व तो हा की, या मतदानाच्या हक्कापासून वर्णाश्रम धर्मावर मोठाच घाला येणार आहे. राजकीय बाबतीत समान आश्रम झाल्यावर सामाजिक बाबतीत वर्णाश्रम धर्म राहणे शक्य नाही. आज राजकीय बाबतीत एका ब्राह्मण उमेदवारास जर भंग्याजवळ मतांची भीक मागण्याची पाळी आली तर वर्णाश्रम धर्म राहिला कोठे? असा हा रंकाचा राव होण्याचा राजमार्ग आपण आधी अवलंबिला पाहिजे. इंग्लंडातील मजुरांची तरी काही वर्षापूर्वी आपल्या प्रमाणेच हीनदीन स्थिती होती. १८६० पर्यंत लिबरल लोक आपला उद्धार करतील अशा आशेने ते स्वस्थ बसले होते. *''परी जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला व जो प्राणपणानी कष्टत गेला, तोचि भला ।।''* याची जाणीव पटून त्यांनी आपला उद्धार आपणच


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

करण्याचे ठरविले. या त्यांच्या कार्यात त्यांनी मतदानाच्या हक्कास प्रधानपद दिले होते व तो हक्क प्राप्त करून घेण्यास त्यांनी आपली सर्व शक्ती खर्च केली. अखेर त्यांचा जय होऊन आज ते राज्यारूढ झाले आहेत व आपल्या मनाप्रमाणे सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणा घडवून आणित आहेत. याचे मूळ कारण म्हणजे त्यांना मतदानाचा हक्क विस्तृत प्रमाणात प्राप्त झाला आहे. हेच होय. आपण जर तशा तऱ्हेने यत्न केला तर आपणासही आपली उन्नती करून घेता येईल.

पण जे ध्येय आपण आपल्यापुढे ठेवतो त्या ध्येयाला आधारभूत असणारी तत्त्वे आपल्या प्रतिपक्षापुढे मांडून कार्यभाग होत नाही हे आपण विसरता कामा नये. कोणताही एखादा प्रसंग गुदरला म्हणजे ज्या लोकांवर तो प्रसंग गुदरतो. ते लोक प्रथमत: तत्त्वावर वादविवाद करीत सुटतात. जो तो आम्ही माणसे नाहीत काय, कुत्री, मांजरं, आमच्यापेक्षा श्रेष्ठ का आहेत, अशा प्रकारच्या तत्त्वाचा वादविवाद घालतात, यात खरोखरीच काही वावगे नाही पण कित्येक लोकांना असे वाटते की तत्त्वांची माळ गोविली की, आपला कार्यभाग झाला व आपण जिंकलो. पण हा भ्रम आहे. निव्वळ तत्त्वाची उभारणी करून चालत नाही. कारण तत्त्वाची उभारणी झाल्याबरोबर त्याचा परिणाम जगाच्या राहाटीवर आपोआप होत नाही. तो परिणाम घडवून आणावा लागतो. म्हणून परिणामाच्या दृष्टीने तत्त्वे मांडण्यापेक्षा ती अंमलात आणण्यास योग्य अशी संघटना तयार करणे त्याहीपेक्षा अगत्याचे आहे. जोपर्यंत संघटना तयार झाली नाही तोपर्यंत ज्या तत्त्वासाठी आपण झगडत आहोत ती तत्त्वे आपल्या प्रतिपक्षाला कबूल जरी असली तरी ती पुराणातली वांगी पुराणातच ठेवण्यात येतील व आपले म्हणणे अरण्यरुदनाप्रमाणे शुष्क ठरेल. ज्याप्रमाणे नशीबाचा गाडा हाकण्यास यत्न–सारथी असावा त्याप्रमाणे तत्त्वांचा इष्ट परिणाम घडवून आणण्यास संघटनाही असावी लागते.

यावरून पाहता मला वाटते, आपल्यात संघशक्ती उत्पन्न करण्यास आपणास एक सर्व अस्पृश्य जातीस व्यापक अशी संस्था असणे फार जरूर आहे. अशी संस्था उत्पन्न झाली पाहिजे. या संस्थेमार्फत आपली दोन कार्ये होतील. एक आपल्याला सार्वजनिक कामाला लागणारा पैसा गोळा करण्यास सुलभ होईल.

दरिद्र्याचे मनोरथ उपजल्याबरोबरच लयास जातात अशी एक म्हण आहे व आमचा समाज गरीब असल्यामुळे आमच्या हातून हा कार्यभाग कसा होईल असा बहुतेकांना संदेह वाटतो. पण माझ्या मते ही म्हण फार तर व्यक्तिमात्रालाच लागू पडते. समाजाला लागू नाही. थेंबे थेंचे तळे साचे अशी दुसरीही म्हण आपल्या ऐकिवात आलीच असेल. आपला समाज जरी गरीब आहे तरी तो संख्येने जबर आहे. आपल्यातील चोवीस लक्ष लोकांपैकी किमान दोन लाख माणसांनीच जर दरवर्षी आठ आणेच दिले तर दरवर्षी एक लाख रुपयांचा फंड तयार होईल आणि अशा प्रकारे दरवर्षी एक लाख रुपये जर जमा होत गेले तर आपली उन्नती होण्यास मुळीच अवधी लागणार नाही. मात्र याला एक मध्यवर्ती संस्था असणे जरूर आहे. अशा जबाबदार संस्थेकडून कायम फंड गोळा करण्याचे काम होईल इतकेच नव्हे, तर आपले धोरण निश्चित करून ते लोकनिदर्शनास आणण्यास सोपे जाईल. आज आमची स्थिति अशी आहे की. ज्याला ज्याला म्हणून र ट फ करता येते त्याला आपण पुढारी आहो, असे वाटून आपले नाव पुढे यावे असे वाटते. इतकेच नव्हे, तर कोणी संस्थेमार्फत काम करावयास तयार नसतात. कारण संस्थेत राहिल्याने त्यांचे नाव पुढे येत नाही. अशामुळे आमच्यात बारभाईची नगरी होऊन गेली आहे व जो तो आपले नाव पुढे येण्यास काही तरी प्रुफ नाचवीत असतो.

या संस्थेने फंड गोळा करून आपल्या अस्पृश्य वर्गाची आतील सुधारणा करण्यास सुरुवात करावी. नुसती अस्पृश्यतेविरुद्ध तक्रार करून उपयोग नाही. आपण विसरतो की. आज हिंदू समाजात जो जातीभेद आहे त्याचबरोबर


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

त्यामध्ये गुणभेद आहेतच आणि जातिभेद जरी गेला तरी गुणभेद हा राहणार आहेच. आज सर्व अस्पृश्य वर्गातील लोकास जरी ब्राह्मण म्हणून संबोधिले तरी, त्यातील कोणी मनुष्य नामदार परांजपे यांच्या जोडीला जाऊन बसण्यास लायक होणार नाही. कारण जातीभेद जरी गेला तरी गुणभेद राहिला आहे. मला तर केव्हा केव्हा असे वाटते की, जातीजातीत जो गुणभेद वाढला आहे, तो जर वाढला नसता तर हा जातीभेद इतक्या दिवस टिकलाही नसता. कारण साऱ्या जातीतील लोक सारख्या प्रमाणात जर गुणवान असते तर त्यांनी एका जातीचे वर्चस्व केव्हाच कबूल केले नसते. गुणभेद जर नसता तर जातीभेद केव्हाच जमीनदोस्त झाला असता. म्हणून मला नेहमी सांगावेसे वाटते की, इतर लोक आपणापेक्षा जसे जातीने श्रेष्ठ आहेत तसे ते व्यावहारिक गुणानेही श्रेष्ठ आहेत म्हणून आपण आपल्या लोकांच्या अंगी व्यावहारिक गुणांची अभिवृद्धी करण्यास प्रयत्न केला पाहिजे आणि आमच्यातील लोकांना जातीभेदामुळे जाळपोळ होत नाही व आपल्यावरील अन्याय दूर करण्यास ते धिंगा घालीत नाहीत याबद्दल आपल्यातील काही लोकास सखेदाश्चर्य वाटते; पण यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. अमुक एक गोष्ट करता येत नाही वगैरे आवेशयुक्त बोल ऐकून त्वेष येत नाही, याचे कारण त्यांना या अन्यायाची जाणीव होत नाही. मनुष्य एखाद्या हुद्यावर चढण्यास लायक असताना जर त्याला जातीभेदामुळे तो हुक्म प्राप्त होत नाही तर, तशा माणसाला जातीभेद कसा नडतो; हे त्याला कळू लागेल व त्याला आपल्या चळवळीचे मार्ग कळून तो तिचा पुरस्कर्ता होईल. पण ज्याला त्या जागेवर जाण्याची लायकी नसेल, तर त्याला जातीभेदाचे उग्र स्वरूप कसे कळणार? जातीभेद असला काय आणि नसला काय, तो आहे तेथेच राहणार म्हणून आपल्या लोकांची लायकी वाढण्याची आपण काळजी घेतली पाहिजे. गुणात समता आली म्हणजे जातीभेदात साठविलेली अस्पृश्यता फार दिवस टिकणे शक्य नाही.

आपला समाज अशा रितीने सज्ज झाला पाहिजे. जशा प्रकारची सामाजिक किंवा राजकीय स्थिती आपल्याला हवी असेल, तशा प्रकारची स्थिती आपल्याला प्राप्त करून घेण्यात फार वेळ लागणार नाही. हे मत कदाचित आपल्याला पोरकट असे वाटेल पण मला वाटते त्याला बराच आधार आहे.

आपल्यात संघशक्ती उत्पन्न केली तर आपण जे मागू ते आपल्याला मिळेल. माझी खात्री आहे की, या संग्रामात जे हिंदू लोक आज विसाव्या शतकात अस्पृश्यता काढा असे म्हटले असता धूळ खात पडलेल्या पुराणास विचारतो असे म्हणतात, तेच लोक ती पुराणे जाळून आपल्याला एकवट करून घेतील, वेळच तशी आली आहे. त्याला नाईलाज आहे.

आपला समाज आज सर्वतोपरी मागासलेला आहे. द्रव्याने मागासलेला आहे, मनोधैर्याने मागासलेला आहे. ज्या समाजातील लोकास राजकीय, सामाजिक व धार्मिक असमता व अन्याय यापासून पराकाष्ठेचा त्रास होत आहे. ज्यातील साऱ्या लोकास गूढ अज्ञानाने व्यापिले आहे, ज्यास विपत्तीपासून होणाऱ्या यातना सोसाव्या लागत आहेत व त्याच्या परिहारार्थ काय करावे समजत नाही, त्या लोकांची सर्वत्र चाललेल्या जीवनकार्यात अखेर गती काय होईल हे सांगता येणे फार कठीण आहे. यासाठी आपल्यापैकी ज्यांना ही स्थिती स्पष्टपणे कळत असेल व ज्याच्या मनात कर्तव्यबुद्धी व परोपकारबुद्धी पूर्णपणे जागृत झाली असेल, त्यांनी आपल्या समाजाचा जीवनार्थ कलहात टिकाव लागण्यासाठी रात्रंदिवस निरपेक्ष बुद्धीने झटले पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून ते जर स्वस्थ राहतील, तर त्यांच्या माथ्यावर आपल्या दडपून गेलेल्या बांधवास विपन्नावस्था आणिल्याची आणि त्यांचा नाश केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे. म्हणून सुशिक्षित बांधव हो! जर तुम्हास इतरांकडून व पुढील संततीकडून बरे म्हणवून घ्यावयाचे असेल व तुमची आज जी स्थिती आहे ती दूर करून तुमच्या मुलांची व नातवंडांची स्थिती अधिक वाईट होऊ नये अशी तुम्हास वास्तविक इच्छा असेल तर ज्या दुर्गतांनी व दुराचारांनी आपल्या लोकांच्या बुद्धीचा, कीर्तीचा व परिस्थितीचा घात चालविला आहे, त्यांचे यथाशक्ती निर्मूलन करणे हे हे आपले कर्तव्य आहे व ते आपण केले पाहिजे.

*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

**संदर्भ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे – भाग १ : १९२०–१९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे : खंड १८, भाग १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्रमांक १८, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००२१, १५ ऑक्टोबर २००२, मूल्य – १०० रुपये, पृष्ठ क्रमांक : १३–२४.

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
(The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
(in English and Marathi),
by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
(To Searches is Education), (in Marathi),
by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh,
Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath,
Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

**विवेकयात्री, लेखक – डॉ. अभिजित वैद्य,**
**राजहंस प्रकाशन, पुणे, २०२६, पृष्ठे – ५११, मूल्य – रु. ११००/–**

जीवसृष्टीतील वरकड प्राण्यांपेक्षा माणूस हा प्राणी निराळा ठरतो, तो त्याला लाभलेल्या दोन शक्तींपायी. वाचाशक्ती ही त्यांतील पहिली तर विचारशक्ती ही त्यांतील दुसरी शक्ती. परंतु, या दोन शक्तींमध्ये आंतरिक सुसंगती अथवा मेळ मानवसमाज घालेलच याची काहीही खात्री नसते व नाही. त्यांमुळेच, ‘विचार’ आणि ‘विवेक’ या दोहोंमध्ये गुणात्मक फरक आहे, हे प्रथम ओळखणे व व्यक्तिगत असो अथवा सामूहिक असो, निर्णयप्रक्रियेदरम्यान विवेकशीलतेला त्यानुसार प्राधान्य दिले जाणे अगत्याचे ठरते. आपला सगळा लोकव्यवहार विवेकनिष्ठ ठरावा, यासाठी डोळस प्रयत्न सतत जारी राखावे लागतात. पुढ्यात उभ्या ठाकलेल्या समस्येबाबत उपाययोजना हुडकतेवेळी तारतम्यपूर्ण विचार होणे, विविध पर्यायांबाबत साधकबाधक मंथन घडून येणे आणि अंतिमत: व्यष्टी तसेच समष्टीच्या व्यापक हिताचे संवर्धन चिरंतन करणारा उपाय त्या वैचारिक घुसळणीद्वारे निश्चित केला जाणे ही सारी प्रक्रिया विवेकशील लोकव्यवहारामध्ये अपेक्षित आहे व असते. अशी नीतीमत्तापूर्ण विवेकशीलता समाजमानसामध्ये रुजणे ही सहजासहजी साध्य बाब ठरत नसते. त्यासाठी, विवेकाची बूज व माहात्म्य अचूक उमगलेल्या प्रगल्भ विवेकनिष्ठांना सतत कार्यशील राहणे क्रमप्राप्त ठरते. जगाच्या पाठीवरील मानवजात एकंदरीनेच विवेकशील बनावी यासाठी काळाच्या विविध टप्प्यांवर, विश्वाच्या विविध भूभागांमध्ये सक्रिय बनलेल्या लोकाग्रणींचे चरित्र आणि चिंतन यांचा अतिशय वेचक, वेधक, रोचक आणि उद्‌बोधक परिचय घडविणारा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे विवेकशीलतेच्या वैश्विक उपासकांचा जणू चरित्रकोशच होय. जगाच्या पश्चिम तसेच पूर्व गोलार्धातील विवेककेंद्री विचारमंथनाचा विवेचक आलेख इथे चितारलेला आहे. ख्रिस्ती, हिंदू तसेच इस्लाम या धर्मांतील विवेकशीलांच्या कार्यकर्तृत्वाचा परामर्ष घेण्याबरोबरच चिनी मातीतील विवेकनिष्ठांची ओळख वाचकांना या ठिकाणी होते. विशेषत:, विवेकवादाची मशागत करण्यात अग्रेसर राहिलेल्या स्त्रीमनांचे लेखकाने या ग्रंथात सादर केलेले अंतरंगदर्शन केवळ विलक्षणच आहे.

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**